# नवरात्री पूजा

चैतन्य लहरी खंड ३ अंक ६ व ७

तुम्ही सहजयोगी आहात.
तुम्हाला काय मिळवायचं आहे?
तुम्हाला तुमची आत्मिक उन्नति साधायची आहे.

- श्री माताजी निर्मला देवी

## परम पूज्य श्री माताजींची प्रवचने
## पहिला व दुसरा दिवस - ११ व १२ ऑक्टोबर १९८८

नवरात्रीच्या पहिल्या दिवशी श्री गणेशांची पूजा झाली. व दुसऱ्या दिवशी देवी सूक्ताचे वाचन झाले.

## तिसरा दिवस-१३ ऑक्टोबर १९८८

देवी कवचाच्या वाचनास सुरवात झाली. श्री माताजी म्हणाल्या

आईच्याकडे आपल्या मुलांचे रक्षण करायला व त्यांचे संगोपन करण्यासाठी अनेक शक्ति आहेत. त्या शक्ति सतत, कोठेही कमी न पडता, २४ तास कार्यरत असतात. आईला जो शरण जाईल, त्याला अडचणीतून सोडविण्यासाठी त्या शक्ति पुढे येऊन प्रयत्न करतात. परंतु, सर्वात प्रथम शरणागति हवी. जर तुम्ही शरणागत नसाल, परमेश्वराच्या राज्यात नसाल, तर मात्र ती आईची जबाबदारी नाही. मग कदाचित एखादी विरोधी शक्ति, नियंत्रण मिळवून तुमचा नाश करेल.

## देवी कवचाचे संदर्भात श्री माताजी म्हणाल्या :
## चौथा दिवस- १४ ऑक्टोबर १९८८

देवी कवचाचे वाचन पूर्ण झाले.

देवी कवचाचे संदीत श्री. माताजींनी उपदेश केला. त्यांनी सांगितले, "आता आपण देवी कवच अगदी लहान केले आहे केवळ बंधन घेतले तरी देवी कवच होते. साक्षात्कारी जीवांनी बंधन घेतले तरी तेच होते. या ठिकाणी, काल व आज जे सर्व काही तुम्ही वाचले "रक्षा करी" ते एका बंधनात घडून गेले.

परंतु हे पहायला हवे की, आपल्यापैकी किती लोक घराच्या बाहेर पडण्यापूर्वी, झोपण्यापूर्वी किंवा कोणतेही महत्वाचे कार्य करण्याचे आधी बंधन घेतात? अगदी क्वचित. तुम्ही विसरता. प्रवासाला निघताना, रस्त्यावर चालताना, बंधन घेणे फार महत्वाचे आहे. आपण ठीकच आहोत, आई आपली काळजी घेते आहे, हा भाग नाही. हे सर्व करण्याचेपूर्वी बंधन घेतलेच पाहिजे.

तुम्हाला एखादा अपघात झाला तर, समजा की तुम्ही काहीतरी चूक केली आहे. काहीतरी वेगळे झाले आहे. सहसा अपघात होऊ नये. अपघात झाला याचा अर्थ तुमच्यात काहीतरी कमतरता आहे.

फार फार वर्षापूर्वी मार्कंडेय ऋषिंनी जे वचनबध्द केले होते, ते तुम्ही आता प्राप्त करून घेतलं आहे. चौदा हजार वर्षापूर्वी त्यांनी वचन दिले होते की जेव्हा महामायेचे आगमन होईल तेव्हा त्या हे कार्य करतील व हे सर्व घडेल. आपण हे लक्षात घेतलंच पाहिजे की ही सर्व वचने आपण आपल्यासाठी पूर्ण करून घेत आहोत. आता आपल्यालासुध्दा काही वचने द्यायला हवीत. स्वतःला प्रश्न विचारायला हवा,' जीवनात आपल्यासाठी जे साध्य आहे ते आपण प्राप्त करून घेतलं आहे का? हा प्रश्न आपण विचारायाला हवा आणि क्षुल्लक गोष्टींच्या मागे भटकू नये. स्वतःसंबंधी एक महान संकल्पना करायला हवी.

स्वभावातच निरासक्तपणा यायला हवा. समजा अनेक समस्यांचेमुळे उलथापालथ चालू आहे परंतु तुमच्यावर काहीच परिणाम होत नाही.

स्वतःला बंधन वगैरे घातल्यामुळे तुम्ही चक्राच्या परिघावर स्थित नसून अक्षावर (axis) आहात. हे लिहिले गेले तेव्हा इतक्या सविस्तरपणे सांगितले नाही कारण ते सहजयोगी नव्हते.

सहजयोगापुढे एक प्रश्न आहे. ज्यांनी कधी देवी पूजा केली नाही, कधी कवचाचे पठण केले नाही, कोणतीच पूजा केली नाही, जे फारसे धार्मिक नव्हते, नमाज पढला नसेल, प्रार्थना किंवा तसे काही केले नसेल, असे लोक सुध्दा सहजयोगात आहेत. सर्व प्रकारचे लोक आहेत. ज्या मंडळांनी हे सर्व पवित्र अंतःकरणाने केले असेल, केवळ बडबड नव्हे, असे लोक साक्षात्कार मिळवतात. त्यांना फारशी पकड येत नाही. पण ज्यांनी यापैकी काहीच केले नाही, त्यांना हे लक्षात घेणं महत्वाचं आहे की त्यांना पूर्णपणे निरासक्त व्हायला हवे. त्याचे काय होतं की असे लोक अक्षापर्यंत (axis) जातात व पुनः बाहेर येतात. म्हणून एखादा देवी भक्त चुकतो. तुम्हाला फार लवकर पकड येते. पण सहजयोगात आपण एक केलं आहे. अशा प्रकारचे फारच थोडे लोक सहजयोगात आहेत, फारच थोडे, एखादाच असेल. बहुतेक सर्व अक्षाच्या वर्तुळात गेले आहेत. म्हणून सहजयोगात आपण असं करतो की आपण सर्वोच्च स्थानांची प्रथम बांधणी करतो. त्यामुळे तुम्ही वर्तमानात रहाता. मग तुमचा भुतकाळ तुम्ही बांधून घ्या. प्रथम सर्वोच्च स्थानी जा. म्हणून मग तुमचा पाया, तुमचे संस्कार, हे, ते, सर्वकाही तुम्हाला स्वच्छ करायला हवं, एखादा कोणी मार्कंडेयासारखाच असेल तर प्रश्नच नाही. म्हणून तुम्हाला स्वतःला स्वच्छ करायला हवं. दुसरा उपाय नव्हता. लोकांनी एक-एक करून स्वतःची चक्रे स्वच्छ करीत उच्च-स्थिती स्थानी यावं व मग त्यांना साक्षात्कार द्यावा, म्हणून किती वेळ वाट पहायची? सर्वात उत्तम म्हणजे त्यांना साक्षात्कार द्यायचा व मग त्यांना स्वतःची काळजी घेऊ दे. मग तुम्हालाच जाणीव होते, मला या चक्रावर पकड आहे, तिकडे पकड आहे, हे होतंय, ते होतय वगैरे. मग तुम्ही स्वतःला स्वच्छ करू लागता. व निरासक्त होऊ लागता. पण कधीकधी दुसऱ्या लोकांचेमुळे आपल्याला पकड येते, ते महत्वाचं आहे.

माझ्या स्वतःच्या बाबतीत, मी माझे शरीर मोकळे ठेवले आहे. मी स्वतःचे अजिबात संरक्षण करीत नाही. मग, ज्याला त्रास आहे असा सहजयोगी माझ्याकडे आला तर मी तो त्रास ओढून घेते व त्याला स्वच्छ करते. मला थोडा त्रास सहन करावा लागतो पण त्याने काही बिघडत नाही. कारण माझ्या त्रासाकडे मी साक्षी स्वरूपाने पहाते. तो काही फार त्रास नसतो. पण हे जाणून घ्यायला हवं की आपण बॅरोमेट्रिक व्हायला हवं. तुम्हाला प्रश्न समजला की तुम्ही बॅरोमेट्रिक झालात. मग तुम्हाला कळतं की या व्यक्तिला हा त्रास आहे. पण तुम्हाला त्यामुळे पकड येऊन त्रास होत नाही. तर जाणून बुजून तुम्ही पकड घेता व त्रास सहन करून ती काढून टाकता. परंतू सहजयोगातसुध्दा एकदा आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर एखादी व्यक्ति परत भूतकाळात जाते पण भूतकाळ त्रासदायक वाटला नाही तरी आनंददायक नसतो. जसे पूजा करणे.

आता, पूजा सुध्दा, लोक देव पूजा करतात. मी साक्षात तेथे आहे हे विसरतात. माझी स्तुती गातात, मी समोर आहे हे लक्षात घेऊन गायला हवी. पण तसं होत नाही. तुम्ही फक्त गाणे म्हणता. असं वाटायला हवं की माझ्या समोर बसून तुम्ही माझी स्तुति गात आहात. अजून तुमचे, "देवीची स्तुति गात आहात" हा संस्कार सुटत नाही. पण देवी कोण आहे? हा पूल ओलांडून पलिकडे यायला हवं. तुम्ही माझ्याकडे पहाताना माझ्या अंतर्यामी गेलात तर ते जास्त चांगलं होईल. तुमच्या मनावर केवढी पकड आहे.' धर्म हीच एक मोठी पकड आहे. सहजयोगासाठी जैन लोक फार अवघड आहेत. जैन जर सहजयोगात आले तर ते फार कठीण लोक असतात. कारण त्यांचे संस्कार फारच खोलवर असतात. आर्य-समाजी लोकांचे संस्कार ही फार खोल असतात. बौध्दांचे तसेच. ते निराकार मानतात पण परमेश्वराला नाही. असं पहा, ' आपल्याला बुध्द माहिती नाही, महम्मद माहिती नाही. आपण त्यांना पाहिलं नाही. आपण महावीरांना जाणत नाही. आपण कोणालाच जाणत नाही. आपल्याला आत्मसाक्षात्कार कोणी दिला? श्री माताजींनी." ते आपल्याला श्री माताजींच्यामुळे कळले. म्हणून ज्यांना कुणाला आपण मानतो, ते श्री माताजींच्यामधेच मानायला हवे. सहजयोगात नाही. आता दुसऱ्या बाजूने पाहिले तर काहीच जमत नाही मग भूतकाळात जाते. मग प्रश्न असा निर्माण होतो की इकडून-तिकडे, तिकडून-इकडे अशी दोलायमान परिस्थती होते. मन स्थिर करून लक्षात घ्या- वर्तमानात काय आहे? तुमच्या समोर कोण आहे. तुम्हाला कोणी आत्मसाक्षात्कार दिला?

याशिवाय अडचण अशी आहे, की मी महामाया आहे, आजपर्यंत जे लिहून ठेवलं आहे ते तुम्हाला महामायाच देणार आहे. जेव्हा महामाया येते तेव्हा ती इतकी मानव स्वरुपी आहे की मी, निसटू शकते. तुम्ही मला ओळखू शकत नाही. जेव्हा जेव्हा तुम्ही सत्याच्या जवळ येता तेव्हा तुम्ही महामायेच्या जाळ्यात अडकता. इतकी मी मानवी आहे. हा तुमच्यापुढे प्रश्न आहे. पण हे एका समस्येचं उत्तरही आहे. समजा, आताच ज्या देवींचं वर्णन तुम्ही ऐकलं त्यांच्यापैकी मी एक असते, कायम हातात तलवार,-त्यांच्या जवळ कोणी जाऊ शकणार नाही. वाघावर, सिंहावर आरूढ, कोण त्यांच्या जवळ जाईल ? कोण त्यांना प्रश्न विचारील? त्यांचं उत्तर कसं मिळणार? मला तुम्हाला मार्गदर्शन करायचंय, अनेक कामं करायची आहेत, तुमच्यात काय अडचणी आहेत, ते सांगायचे आहे. हे सर्व त्यांच्यापैकी कोणीच केलं नसतं. त्या फक्त तलवार उचलतात आणि ---- (श्री माताजी हसतात)----विनोद नाही, बोलणं नाही, करमणूक नाही काही नाही. एखाद्या मोठ्या गुरूसारखं. एखाद्या संगीतकाराच्या शिष्याने, एक सूर जरी चुकीच्या पध्दतिने काढला, तरी तो त्याला फटका देतो. पण महामाया तसं करू शकत नाही. तर काहीच सहन करता येणार नाही. त्या देव-देवतांच सहन करीत नाहीत. त्या सर्व माझ्यात आहेत. मला माहित आहेत, त्या तिथे आहेत ते. मी त्यांना नियंत्रित करते. मी म्हणते, "आता पहा,सर्व जमून येईल". दोन्ही बाजूने आहे. जितकी मी जास्त जवळ, तितकं तुम्हाला ते अवघड आहे. उदा. माझ्या मुली मला ओळखत नाहीत. माझी नातवंडे मला लगेच ओळखणार नाहीत. माझे पति मला ओळखणार नाहीत. माझे नातेवाईक मला ओळखणार नाहीत. त्यांनी जर मला पूर्णपणे ओळखले तर ते फारच महान लोक होतील! एका दृष्टिने ते म्हणा बरेच आहे. समजा माझे संपूर्ण कुटुंब माझ्या कार्यात आहे. लोकांना वाटेल मी संस्थाच उभी केली आहे. तेव्हा, शक्य आहे तो पर्यंत या मंडळींना बाहेर ठेवलेलंच चांगलं दिसतं. ते काही अवघड नाही. आता त्या मंडळींनी या कार्यात उडी घेण्याची वेळ आली आहे. आता मी स्वतःला प्रस्थापित केलं आहे. तुम्हाला माहिती आहे, मी माझ्या नातेवाईकांना favour करीत नाही.

या सर्व पुस्तकांनी सहज योगाबद्दल सर्व सांगितले आहे पण हे सर्व धर्म त्यांच्या खऱ्या स्वरूपात, त्यांच्या शुध्द स्वरूपात आपल्याला आणायचे आहेत. हे कार्य करायचं आहे. धर्मांना त्यांच्या अत्यंत शुध्द स्वरूपात आणायचं. जसं माणसांनी त्यांना रूप दिले आहे, तसंच त्यांच पालन करायचं नाही, हे धर्म मानवांनी बनविले नाहीत, अवतारांनी बनविले आहेत. माणसांनी त्यांना कृत्रिम बनविलं आहे. अनेक निरर्थक गोष्टी केल्या आहेत.

लक्षात ठेवा, धर्म त्यांच्या खऱ्या व शुध्द स्वरूपात एकसारखेच आहेत. त्यांचा पूर्ण आदर करायला हवा. एखाद्या फुलाच्या अनेक पाकळ्या असतात तसं खऱ्या स्वरूपात सर्व धर्म सारखेच आहेत. एक पाकळी अगदी दुसऱ्या पाकळीसारखी दिसणार नाही, पण सर्व मिळून फूल बनते.

## पाचवा दिवस-१५ ऑक्टोबर १९८८

अर्गला स्तोत्रांचं वाचन झाले. श्री माताजी म्हणाल्या-

तुम्ही सहजयोगी आहात.

तुम्हाला काय मिळवायचं आहे?

तुम्हाला तुमची आत्मिक उन्नति साधायची आहे.

यानंतर निर्मल शक्ति युवा संघाच्या मुला मुलींनी जोगव्याचे गायन केले.

## श्री माताजींनी जोगव्याचे स्पष्टीकरण केले

संत एकनाथ, प्रतिष्ठान म्हणजे पैठण येथे रहात होते. त्यांनी हा जोगवा लिहिला आहे. जोगवा याचा अर्थ योग. त्या काळात, खेडवळ भाषेत हा जोगवा गायिला होता आणि आज संपूर्ण महाराष्ट्रात असंख्य लोक गातात. कल्पना करा, अनेक वर्षांपूर्वी हे गाणे लिहिले होते. या लोकांनी त्याचे सहज योगासाठी रूपांतर केले आहे. परंतु त्या काळात लोकांना काय हवे होते, त्याचे अगदी तसे वर्णन त्यात केले आहे. आता, महाराष्ट्रात देवीला

बया म्हणतात. तुम्हाला आश्चर्य वाटेल माझ्या लहानपणी माझे नांव बया होते. माझ्या कुटुंबात मला बया या नावाने बोलवयाचे. ते म्हणतात, "मी आईचेकडे योग मागेन," याला खेडयात जोगवा म्हणतात. शिवाय ते म्हणतात बयेचा जोगवा. याचा अर्थ मी देवीकडे जोगवा मागेन. आता, अनादि निर्गुणी,-आदि व त्याचेही पूर्वीची अशी अनादि, निर्गुणी, कोणतेही गुण नसलेली, अशी भवानी या पृथ्वीवर प्रगट झाली आहे व ती महिषासुराला मारण्यासाठी आली आहे, शिवाय, ती, त्रिविध तापांची करावया झाडणी आली आहे. त्रिविध ताप काढून टाकण्यासाठी ती आली आहे व आपल्या निर्वाणासाठी येणार आहे. ते म्हणाले," मी माझ्या निर्वाणी येईल तेव्हा मी काय करीन- तर द्वैत, म्हणजे, परमेश्वरापासून मी स्वतःला वेगळा समजतो- जग व परमेश्वर वेगळे आहेत असे मानणे म्हणजे द्वैत आणि आपण परमेश्वराशी एकरूप आहोत असे मानणे. हे अद्वैत-तेव्हा हे द्वैत काढून टाकून मी तिला माळ घालीन. मग हातात बोधाचा प्रकाशित ज्ञानाचा (त्यानी आधीच वर्णन करून ठेवले आहे) झेंडा घेऊन, जाति, धर्माच्या भेद-भावा विरहित, तिला भेटायला जाईन. मग मी काय करीन, नऊ दिवस या देवीची नऊ प्रकरे भक्ति करीन व ज्ञानरूपी पुत्राची मागणी करीन, इतर सर्व मागणे सोडीन.-

हे गीत एखाद्या स्त्रीने म्हणावे असे लिहिले आहे- आता मी दंभाचा व अहंकाराने भरलेल्या संसाररूपी पुत्राचा त्याग करीन. पूर्ण बोधाची (प्रकाशीत ज्ञानाची) परडी भरीन, आशा - मनिषा, आकांक्षांच्या दरडी जमिनदोस्त करीन. मनोविकारांची (मनावर झालेले कुसंस्कार) कुरवंडी करून पृथ्वीवरून त्यांना काढून टाकीन व अमृत रसाची दुरडी भरीन.

आता साजणी, मी पूर्णपणे निःसंग (निरासक्त) झाले आहे. विकल्प(संशय) रूपी नवऱ्याची संगत मी सोडली आहे, याचा अर्थ माझ्यातील संशय नाहीसा झाला आहे. मग ती म्हणते, काम व क्रोध या मांर्गाना मी सोडून दिले आहे व माझ्यामधील बोगदा,(सुषुम्ना) मोकळा केला आहे. आता पहा-

असा योग मी मागितला, मला मिळाला व मी तो सांभाळून ठेवला आहे. महाद्वारी जाऊन परमेश्वराचे आभार मानले. आता मी जन्म-मरणाच्या या समस्यांमधून मुक्त झाले आहे. त्यावेळी त्यांनी हे सर्व लिहिले होते व आज तुम्ही ते पहात आहात. अगदी तेच व स्पष्टपणे आणि स्त्रीयांचे गाण्यात आता आपल्याला प्रतिज्ञा करायला हव्यांत,स्वतःबद्दल व दुसऱ्यांचेबद्दल.

आपण एक महान गोष्ट लक्षात ठेवायला हवी, आता आपण योगी आहात. ते सुध्दा सहज योगी व सहज योगी म्हणून आपण सर्व श्रेष्ठ असायला हवे. आपल्या वागण्याने, स्वभावाने, इतर लोकांचे बरोबरीच्या व्यवहारात, कोणत्याही परिस्थितीत व अडचणीच्यामधून मार्ग काढताना, आपण सर्वश्रेष्ठ असायला हवं. आता तुमच्यापैकी काही अत्यंत बुध्दिमान आहात, पण हृदयात कमी पडता, या उलट काही अत्यंत विशाल हृदयाचे आहेत, पण बुध्दिने कमी पडता. तेव्हा संतुलनात यायला हवे. परंतु सर्वात श्रेष्ठ ज्ञान, सर्वश्रेष्ठ ज्ञानाचेमधे महान ज्ञान हे की परमेश्वर प्रेम आहे. ते प्रेम आहेत आणि तुम्ही सहज योग्यावरही प्रेम करु शकत नसाल तर तुमच्यात काहीतरी फारच बिघाड आहे व तो जायला हवा.

प्रेम असायला हवं आणि ज्याला निर्वाज्य प्रेम म्हणतात ते हवं. म्हणजे व्याजविरहित, केवळ मुद्दल. याचा अर्थ असा की तुम्ही एक दुसऱ्यांवर असं प्रेम करा की तुम्हाला निरपेक्षपणे देण्याची आवड हवी. फक्त देण्याची व देण्याचा आनंद फारच महान आहे. माझ्या अनुभवावरुन मी तुम्हाला सांगते. साक्षात्कार (जागृति) द्यायची असते, तेव्हा मला सर्वात जास्त आनंद होतो. दुसर म्हणजे जेव्हा मी इतरांना काही वस्तू देते. तिसरं म्हणजे काहीतरी देता येतं हा आनंद. तेव्हा तुम्ही लोक आता घेणाऱ्यांच्या बाजूचे नसून देणाऱ्यांच्या बाजूचे असल्याने, दुसऱ्याला तुम्ही काय दिले आहे हे पहा.

याउलट तुम्ही अजूनही क्रोधी स्वभावाचे असाल, तुमच्यामध्ये हावरटपणा असेल अथवा सहजयोग्याला शोभणार नाही असं सर्व तुमच्यामध्ये असेल, तर याचा अर्थ असा की, तुम्ही बरेच काही मिळविले नाही. तुम्ही जर कपडे, खाण-पिणं, ऐष आराम यांचे बाबतीत फार काळजीपूर्वक असाल

तर लक्षात घ्या की तुमच्यात काहीतरी कमतरता आहे. अजून तुमचे व्यक्तिमत्व पूर्ण नाही. एक वाक्य कायमचे लक्षात ठेवा. स्वतःला प्रश्न विचारा- "जीवनात मला जे मिळवायचे होते ते मी मिळवले का?"

हा एक प्रश्न तुम्ही विचारा. "माझे जीवन साध्य मी प्राप्त केले आहे का?" त्यामुळे सर्व परिस्थिती तुमच्या लक्षात येईल. कारण तुम्ही आपले स्वतःचे गुरु आहात, तुम्ही सर्व जाणता. सहज योग तुम्ही बुध्दीने शिकला आहात. पण जेव्हा तो तुमच्यामध्ये अंतर्यामी खोलवर जातो व सर्व ज्ञान तुमच्या शरीराचा अविभक्त भाग बनतो तेव्हा फारच निराळे असते. साक्षात्कारी जीवाची संपूर्ण वृत्तिच वेगळी असते. माझेच घ्या - एखादा प्रश्न माझ्या लक्षात आला की लगेच मी ध्यानात जाते व लगेच तो प्रश्न सुटतो. कारण ती माझी शक्ती आहे. तसच जर एखादा प्रश्न तुमच्या लक्षात आला आणि जर तुम्ही ध्यानात गेलात तर तो प्रश्न माझ्याकडून सोडविला जाईल. म्हणजेच ध्यानात तुम्ही मला शरण जाता. मग ते काम माझे. पण जर तुम्ही आपल्या बुध्दिने अथवा बोलण्याने तो प्रश्न सोडवू लागाल तर तुम्ही सापळयात अडकता. तेव्हा तुम्हाला एखादी अडचण आली तर तुम्ही ध्यानात जा, प्रार्थना करण्याची पण आवश्यकता नाही. फक्त ध्यानात जा. आणि त्या अडचणीतून तुम्ही यशस्वीरित्या बाहेर पडाल.

आज तुम्ही माझ्याकडे यशाची मागणी करीत होता. मला हे तुम्हाला सांगायच आहे की ध्यानाच्या स्थितीच्या किल्ल्यांत तुम्ही सुरक्षित असता, सुस्थितीत असता व ध्यानातच तुम्ही मोठे होता. अन्यथा तुम्ही मोठे होऊ शकत नाही. वृक्षाला सूर्यप्रकाश असतो तसं ते आहे. तुम्ही ध्यानात निर्विचारतेत असायला हवं, दुसऱ्याला विरोध करायला नको अथवा त्याच्याशी सहमत व्हायला नको, काही म्हणायला नको. विशेषतः दुसऱ्या योग्यांचे संबंधी. कोणी विचित्र वागत असलेला तुम्हाला आढळला तर, फक्त ध्यानात जा आणि परिस्थिती कशी बदलेल त्याचे तुम्हाला आश्चर्य वाटेल. ही तुमची शक्ती आहे. जगात किती लोकांना साक्षात्कार मिळाला आहे? फारच थोडया! ते मोठे होत आहेत. कार्य करीत आहेत. पण ते ध्यानाच्या शक्तिमध्ये कमी पडतात.

सर्वात उत्तम म्हणजे शरणागति आणि शरणागत होणे सर्वात सोपे आहे. फक्त तुम्ही मला ह्रदयात ठेवा, सतत, हा सर्वात सोपा मार्ग. मग त्याचे शिवाय तुम्ही राहूच शकत नाही, जगूच शकत नाही, एकदम विचित्र वाटतं. हे अगदी निरासक्त प्रेम आहे.

तुम्हाला अगदी, आरामदायक, आनंदी व समाधानी वाटतं. मग तुम्हाला कशाचीच गरज नसते. त्या स्थितीकडे प्रस्थापित व्हायला हवं.

तुम्हाला ते इतकं सहजसाध्य आहे. कारण मी स्वतः तुमच्या बरोबर आहे. तुम्हाला सांगितल्याप्रमाणे सहजयोगात फक्त एकच अडथळा आहे की, सुरवातीलाच तुम्ही मला ओळखायला हवं. परंतु मला ओळखणं हे थोडसे अवघड आहे कारण मी महामाया आहे आणि त्यामुळे महामायेने निर्माण केलेल्या गोंधळात बहुतेक तुम्ही अडकता. पण परवा मी तुम्हाला सांगितले तसे, माझ्या दुसऱ्या रुपांत तुम्ही माझ्यासमोर येऊ शकला नसता. वाघावर बसलेली, हातात तलवार घेतली आहे, अशा व्यक्तिची कल्पना करा. तुम्ही माझ्यासमोर येऊ शकला नसता. म्हणून मला महामाया व्हावं लागलं, कारण या रुपांत तुम्ही माझ्याजवळ येऊ शकता, माझ्याशी बोलू शकता, हव असेल तर माझा उपदेश घेऊ शकता. त्यामुळे मार्गदर्शन चांगलं करता येतं. सर्व काही उलगडून मी तुम्हाला स्पष्टपणे सांगते. पण तुम्ही महामायेच्या समोर बसले आहात हे लक्षात ठेवणे फारच फायदयाचे आहे. तेव्हा महामायेच्या आवरणामुळे गोंधळात पडू नका. माझ्या आदर सन्मानात प्रोटोकॉल्स मला समजून घेण्यात व इतर सर्व बाबतीत तुम्ही कोणतीही चूक करीत नाही, इकडे तुम्ही द्यायला पाहिजे व शरणागत होण्याचा प्रयत्न करा, शरणागत व्हा. आपोआप तुम्ही सर्व शिकाल. शिकविण्यासारखे काही नाही.

ही स्थिती वृक्षासारखी आहे. जेव्हा वृक्ष पूर्णपणे बहरतो, त्यावेळी त्याला फुले येतात. मग फुले स्वतःच्या परिपक्वदशेत गेल्यावर फळे बनतात. अशा पध्दतिने तुमची रचना केली आहे. अशा पध्दतीने तुम्ही मोठे होता. त्यावेळी स्वतःच्या मोठे होण्याचा स्वतःच अनुभव व आनंद घेत सुखाने

रहाता. तेव्हा, तुम्हा सगळयांना सुखी व आनंदी करावं हे माझं जीवनसाध्य आहे. ते मला मिळवायचं आहे. म्हणून हे सर्व प्रयत्न चालू आहेत. माझे व तुमचे जीवन-साध्य मिळविता येईल अशी आशा आहे.

## ईश्वराचे तुम्हाला आशिर्वाद.

## सहावा दिवस १६ ऑक्टोबर १९८८

ही शक्तिची पूजा आहे. आज पर्यंत अनेक संत साधूंनी शक्तीला जाणले आहे व तिच्या विषयी सांगितले आहे. गद्यात ज्याचे वर्णन करता आले नाही ते त्यांनी कवितांच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला. जे वर्णन शब्दांच्या मधे बसविता आले नाही त्याचेसाठी त्यांनी देवीच्या नावांची रचना केली व तिचे वर्णन केले. तुम्ही सर्व हे जाणता. तसेच लोकांनाही या सर्वांचा अर्थ माहिती आहे. परंतु एक गोष्ट त्यांना बहुतेक ज्ञात नाही की प्रत्येक मानवामधे या शक्ति सुप्तावस्थेत असतात आणि त्या शक्तिंना ते जागृत करु शकतात. या सुप्त शक्ति चिरंतन आहेत आणि असिमीत आहेत. ३३ कोटी देवांचे शिवाय अनेक शक्ति आहेत.

पण आपल्याला असे म्हणता येईल, आत्म साक्षात्कार जो आपण मिळविला आहे तो कोणत्या ना कोणत्या शक्तिच्या कार्यामुळे आपल्याला मिळाला आहे. त्यांच्या शिवाय आपल्याला तो मिळाला नसता.

तुम्हाला आत्मसाक्षात्कार सहज मार्गाने मिळाला आहे. सहज या शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक अर्थ हा की तुम्हाला तो विनासायास मिळाला आहे. दुसरा अर्थ असा की कोणत्याही जीवित क्रिये प्रमाणे हे आपोआप स्वतःच कार्यान्वित झाले आहे. आपणहून तुम्ही त्याचा स्विकार केला आहे. पण या जीवीत क्रियेसंबंधी कोणी जर विचार करु लागेल तर तुम्हाला आश्चर्य वाटेल, तुमची बुध्दी काम करण्याचे थांबेल. समजा तुम्ही एखाद्या वृक्षाकडे पहात आहात. कोणत्या शक्तीमुळे हा वृक्ष इतका उंच वाढला आहे? कोणत्या शक्तिने त्याला अशा रंग-रुपात घडविले आहे? महदाश्चर्य हे आहे, की मानवाला विशेष प्रकारे, त्याला विशेष ज्ञान देऊन, विशेष रुप देऊन बनविले आहे, त्या मानवाचा जीवन-हेतू साध्य करता येतो. त्याचेसाठी पहिली पायरी, म्हणजे आत्मसाक्षात्कार.

जसे तुम्हाला दिवा पेटवायचा असेल तर प्रथम तुम्हाला त्यांत प्रकाश भरावा लागतो. तसे एकदा तुमची शक्ति जागृत झाली की तुम्ही ती पुन्हा प्रकाशित करु शकता. वाढवू शकता. पण त्याचेसाठी आत्मसाक्षात्कार अत्यावश्यक आहे.

परंतु आत्मसाक्षात्कार मिळाल्याबरोबर लगेचच सर्व शक्ति कार्यरत होत नाहीत. म्हणून ऋषी-मुनी व संतांनी, देवी पूजा करण्याची व्यवस्था करुन ठेवली आहे. पण ज्याला आत्मसाक्षात्कार मिळाला नाही, अशा व्यक्तिला देवी पूजा करण्याचा अधिकार नाही.

अनेकांनी मला सांगितले, की सप्तशति पाठ किंवा होम-हवन केल्यावर त्यांना अनेक अडचणी आल्या. त्रास सहन करावा लागला. त्यांना विचारले की तुमच्यासाठी हे सर्व कोणी केले? तेव्हा ते म्हणाले, ब्राम्हणांनी. पण ते ब्राम्हण नव्हेत. ज्यांनी ब्रम्हाला जाणले नाही, ते ब्राम्हाण नव्हेत अशा प्रकारच्या ब्राम्हणांच्याकडून सप्तशति वाचून घेतल्याने देवीचा कोप झाला व त्यामुळे त्यांना त्रास झाला. पण तुम्हाला देवी पूजा करण्याचा साक्षात देवीची पूजा करण्याचा विशेष अधिकार आहे. पण इतरांचे तसे नाही. कोणीही पूजा करण्याचा प्रयत्न केला तर परिणाम उलटा होतो व अपायकारक होतो.

महत्वाची गोष्ट अशी की ही शक्ति इतकी आरामदायी, पोषक, उदार प्रेमळ आणि संपूर्ण आहे. ती अति सौम्य आहे किंवा अति रौद्र आहे.

दोन्हीच्या मध्ये काही नाही. त्याचे कारण असे की जे अतिशय क्रूर आहेत, राक्षसी आहेत, ज्यांना जगाचा नाश करायचा आहे, जे लोकांना भ्रमामध्ये ठेवतात, विविध रुपे घेऊन येतात, कोणी पंडीत होतात, कोणी मुल्ला असतात, कोणी मंदिरात बसतो तर दुसरा मशिदीत, एखादा पोप असतो, दुसरा राजकारणी, असे सर्व राक्षसी प्रवृत्तीचे लोक अशा तऱ्हेने कोणत्या तरी रुपात वावरत असतात. त्यांचा नाश करणे अत्यावश्यक आहे. परंतु हया विनाशकारी शक्तीच्या जवळ तुम्ही जाऊ नये. तुम्ही फक्त इच्छा करायचाच अवकाश आणि या शक्ति स्वतःहूनच कार्य करु लागतील. हे कार्य विश्वामध्ये हे जे चैतन्य सगळीकडे प्रवाहित आहे, ती ही महामाया शक्ति, आणि या महामाया शक्तिनेच सर्व कार्य होत आहे. ही शक्ति विचार करते, सर्व जाणते, सर्व काही लक्षात घेते आणि प्रत्येक गोष्ट घडवून आणते. आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, ती तुमच्यावर प्रेम करते आणि ते प्रेम अगदी निर्व्याज आहे. हे प्रेम तुमच्याकडे काही मागत नाही, तुम्हाला देण्याचीच त्याची इच्छा आहे. तुमची प्रगती व्हावी, कल्याण व्हावे, हीच त्यांची इच्छा आहे.

पण ह्याच बरोबर ज्यांना तुमच्या मार्गात काटे बनून राहायचे आहे, तुमच्या मार्गात अडथळे बनायचे आहे, तुमच्याशी भांडायचे आहे किंवा काही न काही तरी करून तुम्हाला त्रास द्यायचा आहे अशांचा नाश होणे आवश्यक आहे. पण ह्यामध्ये तुम्ही तुमची शक्ति घालवू नका तुम्ही फक्त देवीला आवाहन करा आणि तिला ह्या राक्षसी लोकांचा नाश करायला सांगा. ही फार मोठी गोष्ट आहे. तुम्हाला कोणी त्रास देत असेल, धाकात ठेवत असेल, शिव्या देत असेल तर त्याच्यापासून सुटका करण्यासाठी, तुमच्या मध्ये एक विशेष स्थिती आहे ती आहे निर्विचारीता. प्रत्येक गोष्ट तुम्ही साक्षी रूपाने पहा. समजा, एखादा वेडा माणूस तुमच्या मागे लागला आहे, तुम्ही काय करायचे? त्याचा वेडेपणा पाहायचा, त्याची मानसिक स्थिती पहायची आणि त्याला हसायचे, की हा किती मूर्ख माणूस आहे! त्याच्या साठी तुम्हाला काही त्रास घ्यायला नको. तुम्ही फक्त तुमच्या निर्विचारतेच्या किल्ल्यात जा. निर्विचारितेमध्ये याचा नाश कसा करावा, सर्व प्रेमळ, आनंददायक, पोषक शक्ति तुमच्याकडे येतील. परंतु जोपर्यंत तुम्ही, हा अडथळा मी कसा दूर करावा, याच्यावर उपाय काय करावा, याचा विचार करण्यातच गुंतून पडता तोपर्यंत सर्व त्रास तुम्हालाच होणार आहे, त्याला काही नाही. जसे रामदासांनी सांगितले आहे "अल्प धारिष्ट पाहे". जे काही थोडं धारिष्ट तुमच्यात आहे ते परमात्मा पाहात असतो. परंतु तुमच्यात इतक्या शक्ति आहेत, इतक्या शक्ति आहेत, तुम्ही त्यांना जागृत करा, त्यांना माहिती करून घ्या, त्यांना फुलू द्या व तुम्ही सुखी व्हा आणि स्वतःचा सन्मान करा.

आता सहजयोगांच्या मध्ये सुध्दा या शक्ती जागृत होतात व नष्ट होतात मग पुन्हा जागृत होतात. त्याचे कारण काय असावे? एकदा जागृत झालेली शक्ती नष्ट का होते? जसं एक व्यक्ति मोठी कलाकार होते. सहजयोगात आल्यावर अनेक लोक चांगले कलाकार होतात. ते कला जाणतात, त्यांना समजत असते, त्यांना संवेदना असतात, त्यांना जाणीव असते आणि प्रत्येक जण म्हणतो या माणसात काहीतरी असामान्यता आहे. पण नंतर तो त्या कलेमध्येच गुंतून पडतो. त्याला मान-सन्मान मिळतो, नाव व किर्ती मिळतात व त्यांच्या मध्येच तो अडकून पडतो. त्यांच्यात अडकला कि त्याच्या शक्ती नष्ट होतात, कारण त्याच्या शक्ती सुध्दा त्यात अडकतात. तुम्हाला यापूर्वी मी सांगितले होते त्याप्रमाणे वृक्षामध्ये काय घडते, त्याच्या मधील जीवित शक्ती प्रत्येक फांदी मध्ये, प्रत्येक पाना मध्ये प्रवाहित होऊन परत जाते. त्याच प्रमाणे, ज्या काही शक्ती आहेत, ज्या तुमच्यासाठी कार्य करतात त्या याच शक्तीपासून निर्माण झाल्या आहेत. तुम्हाला त्यांच्यासाठी काहीही करायला नको फक्त तुम्ही त्या शक्तींचे उपकरण आहात आणि एकदा तुम्ही उपकरण झालात की त्या शक्ती कधीही कमकुवत होणार नाहीत अथवा नष्ट होणार नाहीत. बऱ्याच वेळा मी पाहिलं आहे कि सहजयोग्यांचे चित्त अशा गोष्टींच्या मध्ये फारच लवकर जाते. त्यांना मोठेपणा मिळाला, कशामध्ये तरी त्यांची प्रगती लवकर झाली, जी मुले वर्गामध्ये चांगली नव्हती ती पहिली आली, त्यांचे सगळे सुधारू लागले, त्यांना वाटू लागते, मी फार मोठा झालो आणि त्या बरोबरच त्यांच्या शक्ती निघून जातात. आता काय करायला हवे, त्याचा आपण विचार करायला हवा. जर तुमचा धंदा वाढला असेल तुम्हला पुष्कळ पैसा मिळू लागला असेल, तुमच्या मध्ये काहीतरी विशेष घडलं असेल तर तुम्ही काय करावं? तुम्ही हे पूर्णपणे ध्यानात घ्यायला हवं "श्री माताजी तुम्हीच सर्व काही करीत आहात मी काहीच केले नाही. ही कार्य करणारी शक्ती तुमचीच आहे मी काहीच करत नाही." तुम्ही जागृक राहणे अति महत्वाचे आहे कारण तुमच्या शक्ती नष्ट झाल्या तर तुम्हीच मला सांगणार "श्री माताजी माझी शक्ती गेली आणि सर्व काही गेलं." जी शक्ती कार्य करीत आहे, तिला कार्य करू द्या.

हे एखादया वृक्षासारखे आहे. त्याची पाने का गळून पडतात? तुम्ही कधी त्याचा विचार केला आहे? त्याचे कारण म्हणजे बुचा सारखी एक गोष्ट, वृक्ष आणि पाने यांच्या मध्ये तयार होते, त्यामुळे शक्ति (पोषक द्रव्य) पाना मध्ये येत नाही आणि त्यामुळे ते गळून पडते. माणसाचे तसेच होते, त्यांच्या शक्ति एका महान शक्तिशी संलग्न असतात आणि त्या शक्तिने तो काम करीत असतो. पण तो स्वतःला मोठा समजू लागला आणि अहंकारी झाला अथवा दुसऱ्याशी स्पर्धा करण्याचे उद्योग करू लागला की ती महान शक्ति आणि तो यांच्यामध्ये खंड पडतो आणि मग त्याला ही शक्ति मिळविता येत नाही. तो फक्त उपकरण होता, त्याच्या मध्ये प्रवाहित असणारी शक्तिच सर्व काही करीत होती. आता या माईकचे उदाहरण घ्या याच्यातील शक्ति गेली तरी माझे बोलणे थांबणार नाही. म्हणून इकडे पूर्ण पणे लक्ष द्या, आपल्यामध्ये जागृत झालेली शक्ति जिच्यामुळे आपल्या व्यक्तिमत्वामध्ये एक नविन प्रकाश प्रतिबिंबित होतो आहे, त्या शक्तिला तुम्ही थांबवू नका. आपण फार मोठे झालो आहोत, असा विचार सुध्दा मनात आणू नका.

याच्या उलट ही शक्ती जागृत झाल्यावर तुम्हाला असे वाटू लागते, की दुसरी व्यक्ति इतकी पुढे गेली आहे पण मी मात्र नाही. त्यांने एवढे केले आहे आणी मी मात्र त्या पैकी बरेच केले नाही. याच्या शिवाय, काही लोकांना साध्या साध्या गोष्टीमुळे सुध्दा वाईट वाटते. जसं प्रत्येकाला बॅज मिळाला पण मला मिळाला नाही. गणपतिपुळ्याला विचित्र अनुभव येतात, लोक येऊन सांगतात. एक म्हणतो, मला पनीरची एक पेटी मिळाली आहे व आणखी एक हवी,आणखी एकाने सांगीतले, दुसऱ्याला इतके मिळाले आहे, पण त्याला मात्र काहीच मिळाले नाही. हे काय सांगण्यासारखे असते? त्या आनंदाच्या सोहळ्यात असे क्षुद्र विचार मनात सुध्दा आणायचे नाहीत. याशिवाय कुणाचा नवरा बरोबर वागत नाही, तर कुणाचा नवरा बाहेरख्याली आहे, तर तिसऱ्याची बायको ठीक नाही, म्हणून तो दुःखी आहे. आता मागच्या जन्मात तुमची इतकी लग्ने झालीत, तुम्हाला इतके नवरे होते आणि या जन्मात एक लग्न झालं आहे तर काही तरी करून ते पार पाडा. पण ते नाही, दिवस रात्र तुम्हाला त्याचीच चिंता लागेली असते. मला हा त्रास आहे, मला तो त्रास आहे, हे कधी संपणार आहे की नाही? ह्या लहान सहान गोष्टीच्या पलिकडे कोणी जाणार आहे की नाही, तेच समजत नाही. कोणीही जेव्हा अशा क्षुद्र निरर्थक गोष्टी मला सांगते तेव्हो मला हसायलाच येते मी शांत रहाते पण त्यांना सांगते "तुम्ही सहज योगी आहत, मी तुमचे ह्रद्य सागरासारखे आणि मस्तक हिमालया सारखे केले आहे. आणि तुम्ही मामक्षुद्र निरर्थक गोष्टी मला आहेत. तुम्ही याचे, त्याचे सर्व जगाबद्दल बोलता, पण सहजयोगाचे काय? त्याचे बाबतीत मात्र तुम्ही गप्प असता. सहजयोगात काय चालू आहे ते मात्र तुम्हाला माहिती नसते.

आता, मी ऐकले आहे, पुण्यात, ध्यानासाठी थोडेच लोक येतात. कारण टी.व्ही.वर महाभारत दाखवितात. अजून पर्यंत ते महाभारत मी पाहिले नाही. जे पाहिले होते, तेच पुरेसे आहे. आता आपल्याला दुसरे महाभारत घडवायचे आहे. तुम्हाला फारच इच्छा झाली, तर महाभारताची कॅसेट आणा व पहा. पूजा असेल तेव्हा तुम्ही येता. पण, तुमची शक्ति कोठे आहे? ती तर हजारो वर्षापूर्वी महाभारतातच गेली. त्याबरोबरच ही शक्ति पण संपली. जे करमणुकीसाठी आहे, त्यातच लोक गुंतून पडतात. आणि जे अति आहे, ते सहज योगाच्या विरोधी असते. संगीताचे घ्या, ध्यान न करता त्यातच अडकाल, कवितांच्यामधे अडकाल, कोणताही अतिरेक सहज योगाच्या विरोधी आहे. हे व्यवस्थित ध्यानात ठेवा. शिवाय, आपल्या शक्तीमध्ये संतुलन यायला हवे. तरच आपल्याला संतुलित व समग्र ज्ञानाची प्राप्ती होईल. एकाच गोष्टीच्या मागे लागाल, एकीकडेच पहाल, तर तुम्हाला समग्र ज्ञान मिळणार नाही.

माझ्या लक्षात आले आहे, अनेक सुशिक्षित स्त्रिया वृतपत्र वाचत नाहीत. जगात काय चालू आहे त्याचे त्यांना अजिबात ज्ञान नाही. एखाद्या व्यक्ति संबंधी विचारले तर त्यांना माहिती नसते. तसेच पुरुषांचे ज्यांना फक्त माहिती असते, कोणत्या घरात काय जेवण बनले आहे, व कोठे चांगले जेवण मिळेल. जेवणाच्या बाबतीत भारतीय पुरुष फारच त्रास देतात व बायकांनाही ते आवडते. त्या खाण्याचे विविध पदार्थ बनवतील. याच्यामुळे त्यांच्या शक्ति अडकतात. 'मला हे खायचे आहे, ते खायचे आहे, या ताटांत खायचे आहे, त्या ताटात खायचे आहे, हे करा, ते बनवा, बायकाही नवऱ्यांना खूष करण्यासाठी, त्यांना हवा तो पदार्थ बनवितात. याच्यामधे स्त्रियांच्या व पुरुषांच्या शक्ति नष्ट होतात. म्हणून मी ही पध्दत सुरू केली

आहे, सहज योगात, आपण स्वतःचे जेवण तयार करायचे. कोणी म्हणाले, मला अमुक खायचे आहे, तर बनवा आणि खा. फार तर, भूकेच रहावे लागेल. जे बनविले असेल ते आवडीने खा नाहीतर स्वतःच बनवा. स्वतः तयार केल्यावर तुम्हाला कळेल किती त्रास होतो बनविण्याला! कशाचीही स्तुती करणे किंवा त्याच्यात दोष काढणे सोपे असते, पण ते स्वतःच तयार केल्यावर लक्षात येईल की आपण जे मतप्रदर्शन करतो ते न्याय्य नाही.

लोक जेव्हा अशा क्षुल्लक गोष्टींच्यामधे लक्ष घालतात तेव्हा मला आश्चर्य वाटते. तुम्ही संत आहात. तुम्हाला फार मोठ्या शक्ति मिळाल्या आहेत. सर्व प्रकारच्या शक्ति तुमच्यात आहेत. त्यांचा उपयोग करा, तुम्ही काहीही करू शकाल! तुम्ही जमीनीवर झोपा, रस्त्यावर झोपा, दहा दिवस न खाता रहा, तुम्हाला काहीही होणार नाही. कोणतेही अन्न खा, पाश्चात्य सहज योग्यांचे पहा, कोणत्या परीस्थितीत व अडचणीत ते राहतात! भारतीय सहज योग्यांनी मला सांगितले की ब्रम्हपुरीला व्यवस्था चांगली नव्हती, जेवण चांगले नव्हते, आपण नसल्यामुळे, खाण्याचे, पिण्याचे फारच हाल झाले. म्हणून गेल्यावर या लोकांना मी विचारले, सर्वात जास्त कोणती जागा आवडली. ते म्हणाले आम्हाला सर्वात जास्त आनंद ब्रम्हपुरीला मिळाला. मी विचारले की त्या ठिकाणी काही भास झाला का? तेव्हा त्यांनी सांगितले, त्या ठिकाणी कृष्णा नदी आहे, आम्ही आंघोळी केल्या, बसलो, आम्हाला, आमच्यात चैतन्य वहात होते, असे वाटले? ते या गोष्टी बोलत होते व इकडे, ही मंडळी खाण्या-पिण्याचाच विचार करीत होती.

आमची शरणागती कमी आहे असे जेव्हा ते म्हणतात, त्याचे कारण असे आह की आपण अडकलेलो असतो व गोंधळांत असतो.

आपल्या पुरातन परंपरा आहेत. आपले अनेक ऋषि, संत होते. त्यांच्यामुळे चांगले काय व वाईट काय, ते आपण जाणतो. पण त्याच्या बरोबरच आपल्यामध्ये धूर्तपणा आला आहे, कोणीही व्यक्ति उठते व मी राम आहे, मी भगवान आहे. मी सीता आहे, सांगत सुटते. मी एका व्यक्तिच्या बद्दल विचारले लरेक म्हएरले "ते भगपरल आहेत" मी विचारले "तुम्ही कोणालाही भगवान कसे म्हणता? तो म्हणत असला तरी त्याला जाणण्याचे मार्ग आहेत! ज्याला अन्य साक्षात्कार झाला नाही तो भगवान कसा असेल? तसे नसताना, तो सांगत असेल, तर सरळ खोटे बोलतो आहे".

ते म्हणाले "त्यांना पैसा पाहिजे आहे, ठीक आहे, ते पैसे घेतात पण तत्वज्ञान फाच चांगले सांगतांत पैशाचे विशेष काय आहे? तेव्हा, लोक आता पैसे द्यायलाही तयार झाले आहेत. आपल्यापुढे महान आदर्श आहेत, राम, महाभारत वगैरे आणि आपण केवळ, ते घेऊन बसलोच आहोत.

म्हणून, आपल्या अंतर्यामी ज्या महान घटना घडल्या आहेत, ज्यांनी आपल्याला सामावून घेतले आहे, व ज्यांच्यामुळे आपण महान उंची गाठली आहे, त्या आपण लक्षात घ्यायला हव्यात. पण आपण हे लक्षात घेत नाही की जे आपण पहात आहोत ते आपल्याला मिळवायचे आहे. आपल्या अंतर्यामी आपल्याला त्यासाठी इच्छा व्हायला हवी, दिखावटी नको. आता तुम्हाला वाटायला हवे "मला हे मिळाल आहे कां? ज्याच्यासाठी माझा जन्म झाला आहे ते मी प्राप्त केलं आहे का? मला ते मिळवायचे आहे." त्यासाठी आपल्याला प्रामाणिक राहयला हवं, त्याचे शिवाय शक्ती तुमच्याबरोबर निष्ठेने राहणार नाही. एक प्रकारे तुमच्या विचारांच्या बरोबर चालू असलेली ही तुमची लढाई आहे. स्वतःच तुम्हाला हा अनुभव घ्यायला हवां की, तुम्ही हे मिळविलं आहे की नाही. शक्ती पूर्णतया जागृत झाल्या आहेत कि नाही, आपल्याला ते जमते, कारण एक प्रकारे आपण स्वतःलाच त्याचे पासून अलग करीत आहोत. अशा दुटप्पीपणाला सहजयोगात स्थान नाही. ह्दया पासून प्रयत्न करा. तुमच्या अंतर आत्म्यापासून समजून घ्या. बाह्यातील कशाचीही तुम्हाला मदत होणार नाही.

काही लोक चेहरा हसरा ठेवतात, काही गंभीर. बाह्यातील अभिनयाचा काही उपयोग नाही. तुमच्या अंतर्यामातील काही भावना बाहेर येतातच. तेव्हा अभिनय कशाला करायचा? आतल्या भावनाच, बाहेर दिसून येतात कारण आतील भावना शक्तिशी संलग्न असतात व त्या बाहेर येतात. अशा लोकांच्याच लक्षात प्रथम येते की सहज योग निष्ठेने केला पाहिजे.

लोक शरणागत होतात ते मी पहाते आणि मी म्हणू शकते की या शरणागतिच्या मागे फार मोठे आश्चर्य आहे, ते हे की लोकांना वाटते की त्यांना फक्त आध्यात्मिक उन्नतिचाच लाभ होतो व इतर नाही. सहज योगाचे अनेक फायदे आहेत. तुमची मुले चांगली होतात, तुम्हाला चांगल्या नोकऱ्या मिळतात, तुमची बुध्दी चांगले काम करते, तुम्ही नाव कमावता, तुमचा सगळीकडे सन्मान होतो. ज्याला कोणी ओळखत नव्हते, तो प्रसिद्ध होतो. सर्व काही होते. पण आपल्याला काय हवे आहे? आपल्याला अध्यात्मिक उन्नति हवी आहे दुसरे काही नको. एकदा अध्यात्मिक उन्नति मिळाली की व्यक्ति विचार करीत नाही. त्याच्यासाठी बाकी सर्व व्यर्थ आहे. त्याला सर्व संपत्ति द्या, त्याला त्याचे महत्व नसते. त्याला कशाचीही काळजी नसते, इच्छा नसते. काही असले तरी ठीक नाही मिळाले तरी ठीक. जेव्हा या स्थितीला तुम्ही पोहोचता तेव्हा, तुम्ही सहज योगात काही तरी मिळविले आहे, असे तुम्हाला वाटायला हरकत नाही. जो पर्यंत तुम्हाला ही स्थिती प्राप्त होत नाही, तो पर्यंत तुम्ही सहज योगाशी एकनिष्ठ नाही, तुम्ही इकडून तिकडे जात आहात. ज्या महान शक्तिमुळे, जी तुमच्यामधेच आहे, तुम्ही प्रस्थापित होता, ती आहे श्रध्दा. तुमच्या ह्रदयापासून ही श्रध्दा जागृत करा आणि तिच्या भक्तिमध्ये रहा. तिच्या आनंदात रहा. श्रध्दा आनंददायी शक्ती आहे. या निरागस, सुरवात व आनंदात रहा. या आनंदात पूर्णपणे विलीन व एकरूप व्हा.

अडचणी, समस्या वगैरे माया आहेत तुम्हाला शंभर रूपये मिळाले, आता काय अडचण आहे? तुम्हाला दोनशे हवे आहेत. ठीक आहे. पुढचा प्रश्न काय? माझी बायको अशीच आहे, बरं, दुसरी बायको करा. तुमच्या अडचणी तुम्ही स्वतःच कमी करून श्रध्देचा आनंद मिळवायला हवा. म्हणून श्रध्देच्या सहाय्याने, प्रवाहित असलेले आत्मिक सुख मिळवा व तुमची शक्ति वाढवा.

तुम्ही प्राप्त करून घ्यावे म्हणूनच सर्व काही आहे. परंतु आत्मिक आनंद देणारी शक्तिच जर तुम्ही मिळविली नाही, तर काय उपयोग? फुलातून मध घेण्यासाठी मधमाशीच हवी. दुसरी माशी त्यावर बसली तरी मध कसा घेणार? तुम्ही माशी असाल तर सगळीकडे भटकत फिराल, पण मधमाशी व्हाल, तर तुम्हाला सर्व काही मिळेल. हवा तेवढा मध तुम्ही घ्या आणि आपल्या आनंदात रहा, सहज योगात ही सर्वोच्च स्थिती आह. आपले चित्त एकाच स्थितिच्याकडे लागायला पाहिजे, ती म्हणजे आपली आत्मिक उन्नति याचा अर्थ असा नव्हे की तुम्ही सतत बंधन घेतच रहावे किंवा शेंडीला गाठ मारून बसावे.

ज्या परिस्थीतीमधे तुम्ही असाल, त्या मधे तुमच्या ह्रदयस्थ आत्म्याशी तुम्ही एकरूप व्हायला हवे. चैतन्य प्रवाहित होऊ लागते, तेव्हा सर्व देव-देवता, गुरू, संत नामदेव, कबीर वगैरे, तुमच्यामधेच असतात. या संतांना सांगणारे, त्यांची काळजी घेणारे, संरक्षण करणारे कोणीही नव्हते. तुम्हाला हे सर्व मिळाले आहेत. तुम्ही परमात्म्याच्या छत्र-छायेत बसले आहात. त्या छात्र छायेतच तुम्ही स्वतःची शक्ति वाढवायला हवी व आत्मिक उन्नति साधायला हवी. आपल्यामधे किती शक्ति आहेत, त्यांच्यापैकी किती जागृत झाल्या आहेत, आणि त्या कशाप्रकारे कार्य करणार आहेत, ते तुम्ही माहिती करून घ्या. तुमची जी इच्छा असेल ते होईल, "जो जे वांछील तो ते लाहे." तुमची इच्छाच जर बदलली तर, मार्ग व पध्दति पण बदलतील, जसे आज काहींना महाभारत पहायचे होते. आज पूजा आहे, आई येणार आहे मी आले आहे, पूजेसारखा प्रसंग आहे आणि लोकांना कलकत्याहून येता येत नाही. मी साक्षात या इथे बसली आहे! काही लोक काम सोडून सहज येऊ शकले असते. पण त्यांना याचे महत्व समजत नाही. त्यांना समजत नाही की हे इतके महत्वपूर्ण आहे. त्यांच्याकडे श्रध्दा नाही. ते म्हणतात सेवानिवृत्तिनंतर आरामात येऊ. रविवारी ठेवले तरी त्याच्या पुढे मागे सुट्ट्या हव्यात.

आता अशी लोकांच्यासाठी सहज योग आहे कां? घोडे किती दूर जाऊ शकणारे? आणि ही तर खेचर पण नाहीत. आपण म्हणतो सहज योगात ते किती पुढे जाणार! सर्व व्यवस्था झाली आहे, आणखी काय हवे? ते म्हणतात, आम्हाला उद्या ऑफीसला जायचे आहे उद्या तुम्ही जाल! सर्व काही ठीक होईल. पण आता जाल, तर खंडाळा घाटात अडकाल. या सर्व ट्रिक्स मी केल्या तरी तुमच्या डोक्यात काही शिरत नाही. मला वाटते, काहीतरी

करून तुम्ही सन्मार्गावर यावे आणि सन्मार्गावर यांयचे असेल तर त्याच्यासाठी, तुम्हाला मेहनत करायला हवी.

तुमची घसरगुंडी होत असेल, तर मी तरी किती मेहनत करणार?

तुमच्यामध्ये जागृत झालेल्या शक्तिच्या पैकी अनेक शक्ति विविध उंची गाठू शकतात. म्हणून प्रथम, स्वतःला स्वच्छ करा. आणि तुम्हाला किती शक्ति मिळाल्या आहेत, ते समजून घ्या. किती शक्ति तुम्ही मिळवू शकता! किती महान होऊ शकता! काय फायदे तुम्हाला मिळू शकतील, व दुसऱ्याला किती फायदे देऊ शकतो! आपल्या अंतर्यामी मोठा खजीना आहे. तुमच्याकडे त्याची किल्ली आहे. तो उघडाच आहे. फक्त तुम्हाला तो बाहेर काढायचा आहे. व वापरून त्यांच्या आनंदात रममाण व्हायचे आहे.

आज आपण शक्तिची पूजा करीत आहोत. आणि माझी इच्छा आहे की, ही तुमची शक्ती आहे ते तुम्ही लक्षात घ्यावे. त्याच्यामुळे तुम्ही प्रामाणिक व खरे खुरे सहज योगी व्हाल.

संतांना अनेक त्रास सहन करावे लागले, मार खावा लागला. त्यांची काय स्थिती होती ते सांगण्याची आवश्यकता नाही. तुमचे कनेक्शन जोडले गेले आहे पण ते इतके ढिले आहे की आपल्याला ते सारखेच जोडावे लागते. प्रत्येक वेळी ते निसटते. घट्ट करायला हवे. तेव्हा, आता फक्त एवढेच मनात ठेवा की आपल्यामधील सर्व शक्ति जागृत करायच्या आहेत, म्हणजे काही रहायला नको व कोणतीही अडचण यायला नको. सर्व शक्ति एकदम जागृत करायच्या. ही तुमची इच्छा असायला हवी. सर्व प्रयत्नांनी त्या शक्तिंना पूर्णपणे जागृत करा. सगळे चित तिकडे ठेवा. अर्धवट चित्ताचा उपयोग नाही, तुम्ही ना इकडचे रहाल, ना तिकडचे.

एक लहानसे बीज हजारो वृक्षांना जन्म देते. तुम्ही तर मानव आहात, तुम्ही हजारोंना तयार कराल. ती शक्ति तुमच्याकडे आहे. पण बीज रोवल्यावर, तुम्ही त्याची काळजी घेत नाही, रस्त्यावर टाकल्याप्रमाणे. त्याचा वृक्ष होत नाही. शक्ति दबली जाते. तुम्ही स्वतःच लक्षात घ्या, की आपण काय आहोत, काय करीत आहोत, आणि किती पुढे जाऊ शकतो.

या बरोबरच तुमच्या इच्छा पण अगदी क्षुद्र असतात. रस्त्यावरील लोकांच्या सुध्दा तितक्या क्षुद्र इच्छा नसतात. पण तुम्ही वेगळे असायला हवे. " हा कोणीतरी निराळा माणूस इथे उभा आहे." असे लोकांनी म्हणावे. तुमचे प्रकाशित व्यक्तिमत्व उजळून निघेल. कशाचीच भीती नाही. जे बोलणे आवश्यक असेल ते बोलले. जर एखादी गोष्ट सांगण्यासारखी नसेल तर ती सांगणार नाही. पूर्णपणे संतुलनात आहे. अशा प्रकारचे व्यक्तिमत्व तुमचे बनेल. हे सर्व तुमच्या मध्ये आहे आणि तुम्हाला त्याचा अनुभव येईल. प्रयत्न केला तर तुम्ही तुमच्या गुरूच्या जवळ राहू शकता.

आता तुम्हाला वाटेल की तुमच्या सर्व नातेवाईकांनी आजोबा, आजी, सर्वांनी यावे. पण ते शक्य नाही. जे तुम्ही आहात ते, ते नाहीत. त्यांची ती लायकी नाही. नालायक लोकांना आहे तसेच सोडून द्यावे. त्यांच्या साठी कशाला झगडत बसायचे? नालायक आईबाप आहेत ते आपले दुर्दैव नालायक व्यक्तिशी आपले लग्न झाले हे आपले दुर्दैव, असे तुम्ही म्हणा. लायकी नाही त्यांना जबरदस्तीनी सहज योगांत आणून माझ्या डोक्यावर का बसविता? हे ठीक करा ते ठीक करा, कां, तर ती तुमची बायको आहे, वडील आहेत, आजोबा आहेत, माझे नातेवाईक नाहीत, ते सहजयोगात नसतील, तर अशा नालायक लोकांना बाहेरच ठेवा. जे लायक आहेत त्यांच्याशी मैत्री बाहेरच ठेवा करा व आनंद मिळवा. आपण हेच फक्त लक्षात घेत नाही व तेच तेच परत करीत बसतो.

ही भौतिक नाती गोती अशीच चालत राहणार. तुमच्या बरोबर बोलू चालू शकतील, तुमचे त्यांचे चांगले संबंध आहेत असे लोक असतील

तर ठीक आहे. नाहीतर या नालायक लेकांनी सहजयोगात येण्याची काही गरज नाही. कधी-कधी अगदी नालायक लोक सहजयोगात आलेले मला दिसतात. आणि ती मला डोके दुखीच होते. तुम्ही लायक होता म्हणून आलांत व तुम्हाला सहजयोग मिळाला, तुम्हाला आशिर्वाद मिळाले आणी अनेक गोष्टी मिळाल्या. भिकाऱ्यांना देऊन काय उपयोग? शिवाय ते भिकारी आहेत आणि त्याची झोळी फाटकी आहे. ते काही करणार नाहीत त्यांना देऊन तरी काय उपयोग? अशा प्रकारच्या लोकांना बरोबर वागविण्यात काही अर्थ नाही. त्यांच्याशी बोलू नका. कोणताही संबंध ठेवू नका, त्यांचे डोके त्यांनी ठिकाण्यावर आणले, तर ते येतील आणि सहजयोगांत प्रस्थापित होतील. नाहीतर त्यांच्यावर तुम्ही डोकेफोड का करता? त्याने काही साधाणार नाही. त्यांची डोकी दगडा सारखी आहेत. आज आपण विचार करायला हवा की आपण आता आध्यात्मीक व्यक्तिमत्वांचे झाले आहेत आणि आपल्याला हे पूर्व जन्मातील संचिताने मिळाले आहे. कारण आपण बरेच पुण्य केले होते म्हणून आपण इथे बसलो आहोत. व आनंदात आहोत. आपण अधीक उच्च स्थितीला जाऊ शकतो, आपण सागरांत उडी घेणार आहोत तर गळ्यात दगड कशाला बांधून घ्यायचा? तुम्हाला पोहता येत असेल, तर मुक्त राहून पोहण्याचा आनंद मिळवा. आणी तुमच्या सर्व शक्तिचा फायदा घ्या.

आज मी तुम्हाला आशिर्वाद देते की तुमच्या सर्व सूप्त शक्ति जागृत होतील. हळू हळू तुमच्या मध्ये असलेल्या शक्ति प्रवाहीत झाल्याचे तुम्हाला जाणवेल. त्यांच्यामुळे तुम्हाला आनंद व अनेक आशिर्वाद प्राप्त होतील.

## सातवा दिवस १७ ऑक्टोबर १९८८

दुर्गा सप्तशी या ग्रंथातील देवी अथर्वशीर्षाचे वाचन झाले. या मध्ये देवीनें स्वतः बद्दल सांगीतले आहे. श्री माताजींनी त्याचे खालील प्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

- जेव्हा तुम्ही एखाद्याला आनंद देता, त्यावेळी आनंदाचा उगम, आनंदाच्या पलिकडे असायला हवा.
- मी ज्ञान-दात्री आहे.
- आत्म्याच्या प्रकाशाशिवाय, तुम्ही कसे समजणार?
- स्त्रोत, हा अज (जन्म न झालेला) आहे. तो आदी आहे म्हणून जन्मू शकतो. म्हणूनच तो अज आहे. जे आदी आहे, ते कैवल्य आहे, पण कैवल्य जन्म घेऊ शकते.
- आत्मसाक्षात्कार का घेत नाही? त्याचे शिवाय देव पूजा करण्याचा काय उपयोग?
- आत्म्याच्या ज्ञानाशिवाय पूजा करून काय उपयोग? तुम्हाला परमात्म्याचे आशिर्वाद मिळणार नाहीत. हजारो वर्षापूर्वीच हे सांगितले आहे.
- ज्या शक्तिने आपण बोलतो ती वैखरी.
- कोणत्याही देवाचे नांव घ्या, विचारा, तुम्ही आहात का? (चैतन्य लहरी..) कारण, या सर्वांचे सत्व इसेन्स शक्ति आहे. तुम्हाला चैतन्य मिळाले आहे, कारण मी ती शक्ति आहे. कोणाचेही नांव घ्या, संत, ऋषि, महर्षि, ते सर्व मी आहे. त्यांना हे सांगायचे आहे.
- बीज मंत्र म्हणजे वैखरी. वैखरी ही बोलण्याची शक्ति आहे. साक्षात्कारी लोकांनी या बोलण्याच्या शक्तिपासून मंत्र बनविले आहेत. म्हणून, आता, सुधारणा करण्यासाठी, म्हणजे ज्यांनी आपल्या चक्रांची, डाव्या, उजव्या बाजूची सुधारणा कराची असेल तर त्यांनी बीज मंत्र म्हणायचे. बीज मंत्र म्हटल्यास, त्या भागात, बीज जाते, मग बीज अंकुरित होते, व वृध्दिगंत होते. तेव्हा पहिली पायरी म्हणजे, बीज मंत्र म्हणायचा मग. वेगळया चक्रांच्यासाठी वेगळे बीज मंत्र म्हणायचे. तेव्हा एक बीज आहे, व मग वृक्ष तेव्हा, सर्वात प्रथम तुम्हाला बीज माहिती असेल, तर त्याचे उच्चारण करून, तुमच्यामधे बीजारोपण करायचे व नंतर बाकी सर्व म्हणायचे. अशा तऱ्हेने ते बीज वाढेल असे करायचे.

संस्कृत शब्द कुंडलिनीच्या, हालचालींच्या मधून आले आहेत. त्यावेळी नाद निर्माण होतात. महान संतानी हे सर्व रेकॉर्ड करून ठेवले आहे.

अशा पध्दतीने, प्रत्येक चक्राची त्यांच्या पायऱ्यांच्या संख्येप्रमाणे व्यंजने, व स्वर आहेत. त्यांच्यापासून संस्कृत वर्णमाला तयार झाल्या आहेत. म्हणून संस्कृत पवित्र आहे.

हीच भाषा पवित्र केली गेली. प्रथम एकच भाषा होती, त्या भाषेमधून दोन भाषा निर्माण झाल्या, एक लॅटिन व दुसरी संस्कृत. संस्कृत भाषा पवित्र झाली. संस्कृत भाषा संतांच्या कडून आली. त्यांनी सर्व ऐकून ही घडविली. आणि ती "वैखरी" शक्ती आहे. आता 'वैखरी, शक्ती आहे व लिपि आहे. शक्ती आहे आणि वाहक इन्स्ट्रुमेंट आहे. पण ते दैवी पध्दतिने कार्यान्वित करण्यासाठी तुम्हाला त्याचे रूपांतर मंत्राच्या मधे करावे लागते. कोणताही मंत्र तयार करण्यापूर्वी तुम्हाला बीज मंत्र ज्ञात असणे आवश्यक आहे. समजा तुम्हाला स्वतःची कुंडलिनी चढवायची असेल, बीज मंत्र आहे 'ऱ्हीम' आणि या 'ऱ्हीम' पासून मंत्र बनवायचा 'ॐ त्वमेव साक्षात श्री ऱ्हीम'. त्यानंतर सर्व देवतांचे मंत्र म्हणायचे.

- आता तुम्ही सर्व 'विद्यावान झाला आहात

आता ही विद्या हळू-हळू तुमच्यामध्ये कशी गेली, ते तम्ही समजून घेण्याचा प्रयत्न करा. कोणी शिक्षक हातात छडी घेऊन बसला नव्हता. सर्व विद्या आतून व बाहेरून प्रकट झाली. मी जे काही सांगते, ते तुम्ही चैतन्यलहरी वर पडताळता म्हणून तुमच्या हातात त्या जातात. मी सांगते म्हणून तुम्ही त्याचा स्वीकार करता असे नाही तर ते वास्तविक आहे. समजा मी म्हणाले "हे पाणी आहे" मग काय तुम्ही पाणी प्याल व त्याचे मुळे तुमची तहान भागते कि नाही ते पाहाल. तेव्हाच ते पाणी आहे या वर तुम्ही विश्वास ठेवाल.

अन्यथा विश्वास ठेवणार नाही. हे ही तसेच आहे.

-आपण स्वयं सिध्द आहेत.

- रा म्हणजे शक्ति. राधा जी शक्ति धारण करते ती राधा, ती महालक्ष्मी आहे म्हणून ती कुंडलिनीला धारण करते:

- हि, आदिमाता आहे आणि रा शक्ति म्हणजे कुंडलिनी. म्हणून न्हि याचा अर्थ महालक्ष्मी तत्वामधून म्हणजे 'र' मधून जाणारी शक्ति कुंडलिनी. म्हणून आदी पुरूषा कडे जाणारी प्रवाहित होते, म्हणून ऱ्हीम. योग्यांना केवळ संलग्नता हवी असते. योग्यांना योग हवा असतो, म्हणून त्यांना शक्तिची आणि आदिमातेची काळजी घ्यायला हवी. हे अतिशय महत्वाचे आहे कारण कुंडलिनी शक्ति व आदिमाता असायला हवी. चौदा हजार वर्षांपूर्वी त्यांनी हे सर्व लिहिले आहे व ते सर्व सत्य आहे. आणि आता तुम्ही ते जाणता. आता तुम्ही सप्तशति वाचाल तेव्हा तुम्हाला ते समजेल. -चित्त स्वरूपिणी- उजवी बाजू महासरस्वति. सत्वरूपिणी -महालक्ष्मी. आनंद रूपिणी- महाकाली आणि तुम्हाला आता त्यांचे ज्ञान झाले आहे.

"ब्रम्ह ज्ञानासाठी आम्ही आपले ध्यान करतो." त्याचे शिवाय तुम्हाला मिळाले आहे, ध्यानाशिवाय तुम्हाला साक्षात्कार मिळाला आहे. म्हणून ध्यान करायलाच हवे. त्याचे साठी मी काय करावे ते कळत नाही.

साक्षीस्वरूपात तुम्ही शून्य होता. तुमचे मी पण साक्षीस्वरूपात नसते. तुम्ही फक्त पहाता आणि शून्य स्थिति असते. जेव्हा शून्य स्थितीत असता, तेव्हा 'ती' असते. ही 'ती' शक्ति कोणती. तुम्ही निर्विचार असता. हजारो लोकांना निर्विचारना मिळाली आहे. तुमची कुंडलिनी चढली तर ते मला समजते. तुम्हाला समजले नाही तरी मी सांगते की झाले, त्यामुळे तुम्हाला कळते. तेव्हा तुमच्या सर्व अवस्था तिला कळतात. तेव्हा सर्व कल्पना एखाद्या कॉम्प्युटर सारखी येते. ते इतके व्यवस्थित तयार केले आहे की सर्व रेकॉर्ड होते, काय घडते आहे वगैरे. मी बोलत असते, आणि एखादा माणूस मधे बसलेला असतो. मी म्हणते 'हं' म्हणजे चित्त तिकडे सुध्दा आहे. आणि लगेच कुंडलिनी चढते. तर ते असे आहे.

## आठवा दिवस - १८ ऑक्टोबर १९८८

सप्तशतिच्या अकराव्या आध्यायातील महालक्ष्मी स्तुतिचे वाचन झाले.

श्री माताजींनी पुढीलप्रमाणे स्पष्टिकरण व उपदेश केला.

महालक्ष्मी स्तोत्रामधे हे सर्व असण्याचे काय कारण असावे? त्याचे कारण कुंडलिनीचा महालक्ष्मीच मार्ग आहे. अष्टलक्ष्मी, महालक्ष्मी व शेवटी दशलक्ष्मी, अशा महालक्ष्मी मार्गामध्ये एकामागून एक व्यक्त होणाऱ्या शक्ति आहेत. महालक्ष्मी नाडीच्या संदर्भात आपण गौरी बद्दल बोलतो. कारण गौरी म्हणजेच कुंडलिनी म्हणून ते गौरी बद्दल बोलतात. "उदे उदे हे अंबे" असेही महालक्ष्मीच्या मंदीरात म्हणतात. याचे कारण काय तर, महालक्ष्मीच्याच मंदीरात त्यांना असे म्हणता येईल, की हे आई, आम्ही आता तयार आहोत, आमच्यामध्ये महालक्ष्मी तत्व आले आहे, आणि तू आता ऊठ. म्हणून हे आवाहन केले जाते.

''पालन' म्हणजे मुलाचे संगोपन. आई प्रमाणे, महालक्ष्मीच विश्वाचे संगोपन करते. हे देवी, तूच सर्व जगाचा आधार आहेस कारण तू भूमी देवी आहेस आणि भूमी माता होऊन तूच विश्वाला धारण केले आहेस. पृथ्वीमातेमुळे विश्व अस्तित्वात आहे. कारण सर्व विश्वामधून पृथ्वीमातेची निर्मिती झाली आहे. आणि म्हणून पृथ्वी विश्वाचा आधार आहे. समजा तुम्ही घर बांधले आहे. घर अस्तित्वात आहे, पण घराला, आधार, त्यामधे रहाणाऱ्या माणसांचा असतो. अन्यथा ते निरर्थक आहे. लग्नामधे नवराच नसेल, तर लग्न कसे करणार. पृथ्वीच्या केवळ अस्तित्वाने, सर्व विश्व अस्तित्वात आहे व त्याला अर्थ आहे.

महालक्ष्मी, मेदूंची काळजी घेते. मेदूच्या द्वारे तुम्हाला सर्व ज्ञान मिळते. व या मेंदूचे पालन पोषण, महालक्ष्मी शक्ति करते.

परा वाणीचा उगम येथून होतो (श्री माताजी आपला हात नाभीवर ठेवतात)

परा वाणी हा नाद आहे व तो शांत आहे. नंतर तो ह्रदयात येतो आणि तेथे त्याला अनहत नाद असे म्हणतात. पुढे ती पश्यंति वाणि होते, पश्यंति, म्हणजे साक्षीस्वरूप.

ती वाणि-शक्ति, ती नाद-शक्ति, अनहत स्थिती मधे असताना, साक्षिस्वरूप असते. त्यानंतर ती येथे विशुध्दीच्या स्तरावर येते, अद्याप ती मधल्या पातळीवर आहे म्हणून कंठाच्या, स्थानापर्यत तिला मध्यमा म्हणतात. मुखात आल्यावर ती वैखरी होते, म्हणनेच ती बोलते. तेव्हा परावाणिचा अर्थ असा आहे. म्हणजे, देवाला काही बोलायचे असल्यास तो परावाणीत बोलतो, तुम्हाला ते ऐकता येत नाही. देव काय सांगतो, ते तुम्हाला ऐकू येत नाही. तसेच तुमच्यामधे तुमची परावणी आहे. ती अर्थातच मानली आहे, परावाणीचे प्रतिबिंब आहे. ते तुम्हाला ऐकू येत नाही. त्यामुळे काय होते? स्वतःच पृथ्वीवर यावें लागते आणी सर्व समनावून सांगण्यासाठी त्याच्या वैखरी वाणीचा उपयोग करावा लागतो मग त्याच्यामुळे तुम्ही खाली-खाली जाऊ लागता. तेव्हा तुम्ही मध्यमा स्थिति मध्ये येता, त्या ठिकाणी तुमच्या मधील शांतीचा आनंद तुम्ही घेता. नंतर तुम्ही पशंयाति मधे येता. तुमच्या मधील साक्षी स्वरूपत्वाचा आनंद तुम्ही अनुभवता, पुढे तुम्ही परा वाणी मध्ये येता त्या ठिकाणी तुम्हाला नाद किंवा अस म्हणता येईल की माहिति मिळते, केवळ माहिति, आवाज नाही, गोंधळ नाही फक्त विचारा सारखी माहिती मिळते. केवळ माहिती, विचारांना आवाज नसतो. म्हणून प्रेरणा, परा वाणी पासून मिळते पण त्याचा नाद, आवाज नसतो अशा तऱ्हेने कोणत्याही नादा शिवाय हे घडून येते. एका सहजयोग्याने विचारले, "ही परावाणी भवसागरांत आहे की नाभीत, की एखाद्या विशिष्ट स्थानी?" श्री माताजी म्हणाल्या नाभी मध्ये हे लक्ष्मीतत्व आहे. महालक्ष्मी तत्वाला

सुरवात झाल्यावर वरील सर्व घडून येते. परंतु तुम्ही अधीक उच्च स्थितिला जाता. आज्ञा मधे येता तेव्हा ही वाणी अनहत होऊन जाते. अनहत याचा अर्थ चैतन्य लहरींचा आवाज मी ऐकू शकते. म्हणजे माझ्यावर कोणी हात धरल्यास त्यालाही ऐकू येईल. सर्व प्रकारचे आवाज तुम्हाला ऐकू येतात. त्यानंतर ती मस्तकांत येते. सहस्त्रारांत आल्यावर ती स्पंदन निर्माण करते आणि ब्रम्हरंन्द्र उघडते. मग वाणी नाद बनून परमेश्वराशी एक रूप होते. हया अवस्थे पर्यंत ती येते. सर्वसाधारण पणे माणसांमध्यें येथूनच ती बाहेर येते. हा परमेश्वराचा आलेला भाग आहे. पण तो दिला जातो तेव्हा, आज्ञा चक्र उघडते व जेव्हा सहस्त्रार उघडते तेव्हा ही वाणी, हा चैतन्यलहरींचा नाद, पण बाहेर येतो. मुख्य गोष्ट ही आहे, की समजून घ्यायला हवे. जेव्हा तुम्ही निर्विकल्प स्थितीला पोहोचता त्यावेळी, या वाणीच्या माध्यमातून तुमच्या मेंदूमध्ये प्रेरणा येते व हीच वाणी तुमच्या मेंदूमध्ये प्रेरणा देते व तीच प्रेरणा तुम्हाला समजून घेण्याची क्षमता देते जसे मी तुम्हाला सांगते की तुम्ही गर्भित अर्थ लक्षात घ्या कारण तुम्ही आता सूक्ष व संवेदनाशील झाला आहात. म्हणून तुम्ही सूक्ष्मातील समजू शकता आणि सूक्ष्म गोष्टी सांगू शकता जसे काही लोक कवी झाले आहेत.

एका सहजयोग्याने प्रश्न विचारल्यावरुन श्री माताजी म्हणाल्या "सुरवातीस सदाशिव आणी आदिशक्ति अलग झाल्यावर, टणत्कार निर्माण झाला. ती मुख्य सर्व गोष्टीची सुरवात होती. मग आदिशक्तींने तीन रूपे विभक्त होऊन धारण केली. एका रूपाने पंचमहाभूताची सुरवात केली. तो टणत्कार मंगलमय आणि पवित्र होता आणि तो सर्व वातावरणात पसरला. त्याच्यापासून सर्व सृष्टिची निर्मिती झाली. परंतु ही निर्मिति उजव्या बाजू कडून झाली. तेव्हा जरी सर्व बाजूंनी वेढलेले आहे जस हे घर आहे, पण त्याच्या आजू बाजूस काही वेगळेच आहे समजा सभोवताली असलेली हवा ओंकार आहे आणि हे घर बनलेले आहे याचा अर्थ असा नाही की हे घर ओंकाराने बनविले आहे. परंतु त्याने (ओंकाराने) सर्व बाजूने वेढले आहे व वेढले असल्यानेच त्याची हालचाल होते त्याची रूपे निर्माण होतात कारण चैतन्य म्हणजेच ओंकाराने आणी ते सतत मार्गदर्शन करीत असते, आत प्रवेश करते, सर्व घडवून आणते आणि सर्वांमध्ये सुधारणा करते.

दुसऱ्या सहज योग्याने विचारले "श्री माताजी हे सर्व देवींनेच केले आहे का? श्री माताजी म्हणाल्या, सर्व काही देवीच करते हे निसंशय ती सर्व काही करते, ती कार्ती-करवित आहे, ती प्रथम गणेशांना बनविते त्यांच्या मधून मागल्याचे नियंत्रण होते आणी त्या मधून पावित्र्याचे त्याच्या मधून देवी सर्व विश्वाला वेढा घालते. ते झाल्यावर ती आत प्रवेश करते. जसं मी सगळयांना स्पर्श केल्यावर ते पवित्र होते, मंगल होते, कारण त्यात चैतन्य प्रवेश करते. ते कशातही प्रवेश करते. परंतु जे जड आहे त्याच्यात ओंकार नसतो. त्याच्या मध्ये विद्युत-चुंबकीय शक्ति असते. (इलेक्ट्रो मॅग्नेटिक-फोर्सेस) नंतर विद्युत चुंबकीय शक्ति अधिक उच्च स्थिति मधे जातात आणि मग त्यांच्यात नाईट्रोजन प्रवेश करतो. त्यामुळे त्याचा प्राण तयार होतो. हे सर्व, विविध स्तरांवर घटित होऊन, मानवाची निर्मिति होते. मानव स्थितिमधे आल्यावर आत्मसाक्षात्कार मिळेपर्यंत मानव स्थितिच रहाते. त्यांच्यानंतर मात्र बदल होतो. तेव्हा उत्क्रांतीची प्रत्येक स्थिती ओंकार ज्याला चैतन्य म्हणतात. ती आहे व ती प्रत्येक गोष्टीत आहे. तिन्ही शक्ति चैतन्याचा उपयोग करतात. म्हणून त्याला ओंकार अ-उ-म असे म्हणतात. चैतन्याच्या सर्व शक्तिचा उपयोग करून देवी इतर अनेक कार्ये करते. सर्व ओंकाराचा उपयोग होत नाही.

हे बरेच गुंतागुंतीचे आहे. बुध्दिने समजण्याचा प्रयत्न करू नये हे उत्तम. जेवढे जास्त गुंतागुंतिमधे पडाल तेवढी तुमची आज्ञा पकडेल. आज्ञा उतरवायला हवी. आज्ञेचा मार्ग न धरता भक्तिचा धरा. आपोआप हे सर्व तुम्हाला प्राप्त होईल.

परंतु हे काय, ते काय असे सारखे करण्याने तुमची आज्ञा घुसळून निघते, एखाद्या चक्रासारखे हे चालू असते. हे बंद करावे ते बरे. भक्ति करा. आदि शंकराचार्यनी काय केले? प्रथम विवेकचूडामणि लिहिले. नंतर, वाद-विवादाचा त्यांना कंटाळा आला आणि सर्व सोडून त्यांनी भक्तिपर रचना केल्या. म्हणून प्रथम, भक्तिमधे प्रवेश करा. प्रश्न विचारत राहिलात तर त्याला अंत नाही. माझे पुस्तक मी प्रसिध्द करीन-ते तुम्ही वाचा.

ग्रेगॉयर तो पुस्तक लिहिले तेव्हा पहिली थोडी प्रकरणे चांगली झाली, मला प्रथम केव्हा आणि कसा भेटला वगैरे फारच सुंदर लिहिले गेले. त्यांच्यानंतर जणू पहाडच उभा राहिला. त्याने स्वतःचे सर्व ज्ञान त्याच्यात घातले. मी म्हटले, झाले! तुझे पुस्तक कोणीही वाचणार नाही. नंतर , एक वर्ष, त्याचे पुस्तक मी पुन्हा दुरूस्त करून लिहिले, त्याच्यात इतकी-आज्ञा होती, फार अवघड झाले. शेवटी मी त्याला म्हटले, सर्व काही व्यवस्थित जोडले आहे, फक्त ही दोन प्रकरणे शेवटी घालू,त्याला जणू भोवळ आल्यासारखे झाले. मी म्हणाले ही दोन प्रकरणे पहाडासारखी आहेत. ज्यांना बौध्दिक करामति हव्या असतील, तेच फक्त वाचतील ही प्रकरणे. तेव्हा ही शेवटी घाल. तो म्हणू लागला हे कसे करायचे मला सर्व पुस्तक बदलावे लागेल मी सांगितले की मी पहिल्या पासून सर्व वाचेन, पण मी सांगते म्हणून तू ती प्रकरणे शेवटी घाल, आता, ती प्रकरणे कोणीही वाचत नाही. आज्ञावाले लोक वाचतांत आणि पकडतात म्हणून मी सांगते की आज्ञाचा त्रास काढण्यासाठी भक्ति करा. हे इतके प्रचंड आहे की, मी तुम्हाला हा कसा बनविला, कोठून आला, तो काय आहे? त्याचे रासायनिक घटक कोणते? फक्त खायचे! तुम्हाला भूक लागली आहे, तर तुम्ही खा. बौध्दिक करामति फारच वाईट.

पूजा चालू असताना प्रश्न विचारू नये पूजा खंडित होते. चौकशा,मला एक डोके दुखी आहे, सतत लोक विचारत असतात. ते भक्तिमधे खोल उतरले नसतात. तुम्ही मस्तीत, असाल तर प्रश्न विचारणार नाही. जब मस्त हुए तो फिर क्या बोले!

ब्राम्हणाला तुम्ही प्रश्न विचारला, तर हातात चोपणं घेऊन तो तुम्हाला मारेल. चर्चमधे पाद्री प्रवचन वाचत असताना तुम्ही मधेच उठून विचाराल, "सर, तुम्ही सांगत आहात त्याचा अर्थ काय?" तर त्याच्या जवळ असेल ते तो फेकून मारेल.

सर्वस्य बुद्धि रुपेल, जनस्य ह्रदि संस्थिते.

"बुध्दिच्या रूपाने जनांच्या ह्रदयात"-यावर तुम्ही काय बोलणार? बुध्दीरूपाने देवी जनांच्या ह्रदयात वास करते.

विहिरीच्या मधे तुम्ही घागर सोडलीत तर आत व बाहेर पाणी असणार.

एक ध्यानात घ्यायला हवे की पुरूष कायनेटिक, असतात-त्यांची शक्ति कार्यामधून व्यक्त होते. म्हणजे पुरूष अवतार कार्यशक्ति प्रधान होते. सूप्तशक्ति (पोटेन्शियल) ही स्त्रीची शक्ति आहे. श्री कृष्णांनी कंसाचा वध केला तेव्हा त्यांनी श्रीराधाजींना मदत करण्यास सांगितले. शक्तिचे स्वरुप असे आहे. शक्तिच्या शिवाय त्यांना अस्तित्त्व नाही. जसे प्रकाशाशिवाय दिव्याला अस्तित्त्व नाही. म्हणून प्रामुख्याने हीच रूपे असली, तरी त्यांच्यामागे राहून शक्तिनेच सर्व कार्य केले आहे.

अशा तऱ्हेने श्री शिवांनी संतापून राक्षसांचा वध केला कारण त्यांच्यामधे शक्तिने प्रवेश केला होता. शक्ति स्वतः पुरूष शक्ति घेऊन आली नाही. जसं तुम्ही काही मोठे कार्य केले किंवा काही, जिंकले तर तुम्हाला पदक मिळते, हार घातले जातात. तसे देवीने, ज्या राक्षसांना मारले होते, त्यांच्या शिरांच्या माळा परिधान केल्या. कारण त्यांच्यामुळे इतर राक्षसांना तिने घाबरविले की, त्यांना ठार मारून त्यांची शिरे माळांच्यामधे बसविली जातील.

पूजेच्या संबंधी तुमची प्रवृत्ती अशी हवी की तुम्ही देवीच्यामुळे मोहित झाले आहात व म्हणून तिची स्तुति करीत आहात. ते बुध्दीने समजणे नव्हे. तिला प्रसन्न करण्यासाठी सर्व पठणा करीत असता. भाव असा हवा की, की बौध्दिक प्रवचन चालू नसून, तुम्ही देवीची स्तुति करीत आहात.

ज्या व्यक्तिवर तुमचे प्रेम असेल तिला प्रसन्न करण्यासाठी तुम्ही काहीतरी बोलता. तसेच तुम्ही देवीला सांगता. ज्या संतांनी हे लिहिले आहे. ते देवीला सांगत आहेत, आपण अशा आहात, तशा आहात, मला येणारी काही पत्रे अशीच असतात, इतक्या भावना त्यांच्यामध्ये व्यक्त झाल्या असतात. परंतु, ही काही व्याखान माला नव्हे! तर त्यामधे जो भाव आहे, तो अनुभवणे आहे. म्हणून भक्तिने परिपूर्ण होऊन ते करायला हवे.

जे काही तुम्ही वाचता आहात त्याची व तुम्ही माझ्या समोर बसून वाचता आहात, अशी भावना तुमच्या ह्दयात पाहिजे. ह्दयापासून म्हणायला हवे, की पूर्ण नम्रतेने आम्ही आपल्याला सांगत आहोत. ही प्रार्थना आहे. व प्रार्थना यामधे व्यक्त झाली पाहिजे. त्याला प्रार्थनेचेच स्वरूप हवे, बौध्दिक चर्चेचे नव्हे. ही देवीची प्रार्थना आहे. हा, भाव विकसित केल्याशिवाय तुम्ही फार लांब जाऊ शकणार नाही.

हे म्हणत असताना ह्रदयातून ओतायला हवे. ह्रदय उघडा व त्यात ओता. पण तुम्ही प्रत्येक शब्द घेऊन त्याचे विश्लेषण करीत बसाल तर त्याचा काहीही उपयोग नाही. तुम्ही फुलांसारखे आहात. तुमच्या वैखरीमधून तुम्ही मला सांगत आहात. अन्यथा तुम्ही जे म्हणत आहात ते केवळ बडबडणे आहे, तुम्ही जे म्हणाल ते केवळ औपचारिक पणाचे बोलणे होईल.

तुमची ह्दये प्रकाशित करण्यासाठी तुमच्या ह्दयापासून स्तुति करायला हवी, मनापासून करायला हवे. जे काही तुम्ही म्हणत आहात, त्याच्याशी एकरूप व्हायला हवे.

ही कृतज्ञता आहे. तुमची कृतज्ञता तुम्ही व्यक्त करीत आहात, तुमच्या ह्दयात तुम्हाला जे वाटते ते तुम्ही सांगत आहात.

विश्वेश्वर सुध्दा नम्र होतात! विश्वेश्वर म्हणजे सर्व विश्वाचे ईश्वर, जे सदाशिव आहेत, शिव आहेत, ते सुध्दा होतात. पूजा चालू असताना निर्विचार रहा. मी ज्ञान रूप आहे हे तुम्हाला दिसते व मी तुम्हाला ज्ञान देते पण तुम्ही त्याचाच पाठपुरवठा करू नका तुम्ही भक्तिचा पाठपुरावा करा. त्याच्यामुळे तुम्हाला सहजानंद मिळेल. मी तुम्हाला जाणीव करून देते की असे लोक सहज योगाच्या बाहेर गेले आहेत. बौध्दिक ज्ञानाच्या मागे असलेले लोक एकामागून एक सहज योगाच्या बाहेर गेले आहेत. तुम्ही मला प्रश्न विचारू नका. त्याला मी शुध्द बुध्दिमत्ता असे म्हणते. हे माहिती असून काय उपयोग? तुम्हाला तहान लागली असेल, तर भक्तिचे अमृत प्या. तुम्हाला तहान लागली असेल, व मी भाषय दिले तर तुम्ही म्हणाल कृपया पाणी द्या- तुम्हाला जर खरी तहान लागली असेल तर!

बौध्दिक करामति करुन तुम्ही लोकांना सहज योगात आणू शकत नाही, तर चैतन्यातून, आत्मसाक्षात्कारातून तुमच्याशी जर कोणी वाद घालू लागला. तो अहंकारातून बोलत असेल, तर तुम्ही त्यांच्याशी कसे बोलणार? तुम्ही तुमच्या आत्म्यातून बोलणार तर तो त्यांच्या अहंकारातून. त्याला त्याच्या आत्म्यात उतरवा किंवा बंद करा. बहिऱ्याशी बोलण्यासारखे आहे. वाद-विवाद कितीही केला तरी ते वळणार नाहीत. परिवर्तनातूनच अनुभूति मिळते.

## नववा दिवस - १९ ऑक्टोबर १९८८

आज नवरात्रीचा शेवटचा दिवस आहे. आपल्या सगळयांचा हा सर्वोच्च स्थान मिळवण्याचा दिवस हवा. तुम्हाला ज्ञात आहेच की तुमच्या उन्नतीसाठी सात चक्रे आहेत आणि दोन त्यांच्यावर आहेत, तेव्हा या जीवनांत नऊ चक्रे पार करून जायचे आहे. ते तुमचे साध्य असायला हवे. परंतु तुम्ही जर आज्ञावरच जाल व आज्ञावरच हालचाल कराल तर तुम्ही अधिक उंचीवर जाऊ शकणार नाही. त्या चक्रावरच लोक भरकटले आहेत. म्हणून

ते फार महत्वाचे चक्र आहे. देवीचा सहावा दिवस षष्ठी फार महत्वपूर्ण मानला जातो. असे म्हणतात की त्या दिवशी देवी नावेत बसून येते. कलकत्त्या मधील लोकांचा याच्यावर विश्वास आहे, कारण हा दिवस फार मोठा आहे. आपल्या सगळयांची हीच अडचण आहे की सहावा दिवस अजून आपल्या डोक्यावर बसला आहे आणि आपण त्याच्या मधून बाहेर येऊ शकत नाही. तेव्हा नवव्या स्थितीमध्ये आपण पूजा केली व काही जरी केले तरी आपण अजूनी सहाव्या स्थितीमध्येच आहोत. आपण केवळ वर वरचीच पूजा केली. जिथे मी आहे तो सातवा दिवस. परंतु सहावा पार केल्यावरच सातवी, आठवी आणि नववी स्थिती गाठता येते. सहाव्या दिवसासाठी देवीने काय केले हे समजणे महत्वाचे असल्याने मी आज तुम्हाला सहाव्या बद्दलच सांगणार आहे.

महालक्ष्मींनी, मेरी म्हणून अवतार घेतला आणि आपला मुलगा येशु ख्रिस्त याला आणले. तिची इच्छा होती की त्याने इतर सर्वांसाठी सहावे चक्र पार करावे. म्हणून त्याने सूक्ष्म चैतन्याचे शरीर धारण केले. त्याचे शरीर चैतन्याचे होते. तो पाण्यावर चालला, अनेक गोष्टी केल्या आणि दाखविले की तो चैतन्य होता. शेवटी आपले शरीर सोडून सूक्ष्म रुपांत चैतन्यांत विलीन झाला. ही संकल्पना सत्य आहे, वास्तव आहे. परंतु दुसरे कोणी, ज्याला आत्मसाक्षात्कार मिळाला नाही, चैतन्य जाणवले नाही त्याला हे आत्मसात करता येणार नाही म्हणून तो ख्रिस्ताच्या विरोधात जातो. स्वतःच्या आज्ञेतून तो ख्रिस्ताच्या विरोधी कथा रचतो. त्याला आज्ञाच्या पलिकडे जाता येत नाही आणि अश्या वागण्यांनी तो आज्ञा म्हणजे ख्रिस्ताचे स्थान पार करुन जाऊ शकत नाही.

आता आज्ञेचे स्थान असे आहे, की माणसे डाव्या आणि उजव्या दोन्ही आज्ञांवर असतात. डावी आज्ञा तुमच्या भूतकाळामध्ये जाते. तुम्ही तुमच्या देशांचा विचार करता की तो फार महान आहे जसे इंग्लंडमध्ये लोकांना वाटते की ते मोठे सत्ताधारी होते. तसेच काहींना वाटते की ते मोठया घराण्यात जन्माला आले आहेत. अशा अनेक गोष्टी असतात. त्याच्यामुळे तुमची डावी आज्ञा पकडते. या सर्व गोष्टी, ज्या तुम्हाला वाटतात त्या भूतकाळातील असतात. याचे शिवाय, दुसरे लोक जरी त्यांच्या भूतकाळामध्ये रममाण झाले आणि तुम्हाला त्याच्या बद्दल सांगत बसले, की हे झाल, ते झाल, मला असा त्रास झाला, असे व्हायला नको होते, असा विचार करीत असेल, आणि रडत असेल, तर त्याच्यामुळे तुमची आज्ञा पकडेल आणि एकदा आज्ञा खराब झाली की ती पकड काढणे अतिशय कठिण असते कारण ही समस्या तुम्हीच निर्माण केलेली असते.

तिसरा मुद्दा असा की जेव्हा विरोधी शक्ति तुमच्यावर हल्ला करतात त्या वेळी, जेव्हा तो हल्ला होतो तेव्हा तुम्ही कोण आहांत ते पार विसरुन जाता. तुम्ही कोण आहात ते तुमच्या लक्षातच येत नाही. लोकांनी काही सांगितले तरी तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवता. त्यांनी अमूक कर सांगितले की तुम्ही कराल. ते म्हणतील पैसे द्या. तुम्ही द्याल, ते म्हणतील तुम्ही समुद्रात उडी मारा - तुम्ही उडी माराल. असे लोक अनेकांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतात. या डाव्या आज्ञा चक्राच्या माध्यमातून लोक संमोहन (मेस्मेराईज) करतात आणि लोकांना संमोहीत करुन त्यांना हवे ते मिळवितात. त्याचे शिवाय मेस्मेरिझमचा वापर उपचार पध्दतीमध्येही करतात. आजारी व्यक्ती मेस्मराईज झाल्यावर काय होते की त्या व्यक्तीचा शारीरीक आजार म्हणजे,'शक्ती शारीरीक अंगाकडे प्रवाहीत होऊन आजार बरा होतो. परंतु त्या व्यक्तीची डावी बाजू धरते म्हणजे त्याचा आजार बरा झाला तरी त्या व्यक्तीची डावी बाजू पकडते. अशा तऱ्हेने अनेक लोकांच्यासाठी ते काम करतात परंतु त्यांच्यात काही तत्वे घुसवितात. त्यांची स्थिती काही काळच फक्त राहते नंतर पुन्हा पहिल्यासारखे होतात आणि त्याच्यावर एखादा जीवात्मा स्वार असतो. ते थकतात. एकाकी होतात. दुसऱ्यांच्या समोर जाऊ शकत नाहीत. अशा अनेक गोष्टी डाव्या बाजूच्या विरोधी शक्तीच्या कडून घडून येतात, की त्यांचे वर्णन करता येत नाही. उदाः सर्व साइको-सोमॅटिक, आजार, कॅन्सर, मलायटिस, स्नायूंचे आजार, पार्किन्सनस् डिझिज काहीही होते. त्या दिवशी मला एक स्त्री भेटली होती. एकाएकी ती काळी पडली होती, शरीर सुजले होते आणि अंगावर गाठी आल्या होत्या. कोणीच तिला बरे करु शकले नाही. तिने सहज योगाचे तीन दिवस उपचार घेतले. आता ती पुष्कळ बरी आहे. या सर्व गोष्टी डाव्या बाजूच्या आज्ञेमधून येतात काही लोकांना त्यामधेच रहायला आवडते. विशेषतः मुस्लिम संस्कृतीमध्ये मी पाहिले आहे. त्यांच्याकडे त्रासदायक रडगाणे असते. त्यांची गाणी, दुःखे, त्रास प्रेमातील विरह, असला मूर्खपणा असतो. त्याच्यामुळे त्यांच्या डाव्या

आज्ञावर पकड येते. डावी आज्ञा फार जास्त पकडली की ती उजवीकडे घुसते. कारण दोन्ही संलग्न असतात. पण डावी उजवीमध्ये घुसल्यावर, तुम्ही भयानक लोकांच्या (जीवात्मांच्या) हातात सापडता. तुम्ही त्यांना विरोध करीत असता, तो पर्यंत तुम्हाला शरीर दुखणे इ. त्रास होतात. पण त्यांना तुम्ही शरण गेलात की ते तुमच्या माध्यमातून काम करु लागतात. मात्र ते अनेक चमत्कार करतात. उदाः त्यांच्यातून कुंकू येते. पण असे लोक फार प्रभावी होतात. ते असे बोलतात की त्याच्यामुळे लोकांवर मोहिनी पडते. जणू काही ते मोठे तत्ववेत्ते लागून गेले. अशा तऱ्हेने सर्व राक्षिसी प्रकार होतो. तेव्हा डावी आज्ञा उजवीकडे गेल्यावर ते मोठे गुरु घटाल होतात. आजकाल तुम्हाला जे दिसते ते सर्व असेच आहे. त्या लोकांनी डाव्या बाजूची साधना करुन ते प्राप्त केले आहे व त्याच्यावर प्रभुत्त्व मिळवून उजवीकडून त्याचा वापर केला आहे. ही महाभयंकर गोष्ट आहे. डावी आज्ञा वाढल्यावर असे सुध्दा होते की, तुम्ही फार अहंकारी होऊन बढाया मारु लागता. सहजयोगात तुम्ही असे लोक पाहिले असतील. त्यांची मोठी उजवी आज्ञा असते. त्याची सुरुवात डाव्या बाजूच्या आज्ञेमुळे गैर वर्तनातून झाली असते. त्या अवस्थेमध्ये त्यांना परत सहजयोगामध्ये घेता येत नाही. ते सर्व गोष्टी करतात व लोकांच्या वर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात. दिखावटीपणा केला तरी त्यांच्यामधून भूतच बोलते. या स्थितीमध्ये आल्यावर आपण म्हणतो की ते आता सहजयोगाच्या बाहेर आहेत. त्यांना आत घेता येत नाही. म्हणून ती अवस्था टाळायला हवी. डावी आज्ञा असेल तर ती स्वच्छ करा आणि सतत स्वतःवरच रागवा, सारखे रागवा. माझा असा स्वभाव का आहे? शिवाय अश्याही व्यक्ती असतात की त्यांचा अहंकार दुखावलेला असतो. अशी व्यक्ती फारच विचित्र असते. दुखावलेला अहंकार फुग्यासारखा बनतो. फुग्याला आतुन अथवा बाहेरुन मारले तर तो अधिक फुगतो. अशी व्यक्ती फार विचित्र असते आणि कृत्रिमतेनी नम्रता दाखवून आपण आनंदात आहोत असे दाखविते. असे व्यक्तिमत्व सुध्दा विकसित होते.

परंन्तु उजव्या बाजूची आज्ञा अनेक कारणांमुळे पकडली जाते. तुमच्या जन्मामुळे, तुमच्या आई वडिलांच्यामुळे, तुमच्या आई वडिलांनी तुमचे फार लाड करुन प्रमाणाबाहेर महत्व दिल्यामुळे, तुमच्या शिक्षणामुळे किंवा जीवनात मिळालेल्या यशामुळे अथवा तुमचे आई वडील उच्च पदस्थ असतील, अशी अनेक कारणे असतील की ज्यांच्यामुळे तुमची उजवी आज्ञा फुगत जाते. उजवी आज्ञा फुगल्यावर फार भयंकर होते. स्पष्टपणे तुमच्या काहीच लक्षात येत नाही. तुम्ही वेडगळपणाने वागत राहता व तुमचा शेवट होईपर्यंत तुमच्या ते लक्षातच येत नाही की त्याच्या मुळे आपल्याला त्रास झाला. सत्य समजण्याची माणसाची कुवत इतकी लहान आहे - मला दिसते की चेक फाडला तरी लोकांना अहंकार येतो. बँक कार्ड दिले तरी अहंकार येतो. लंडनला एक माणूस माझी कार चालवत असे. जेव्हा तो कार मध्ये बसायचा त्या वेळी त्याची आज्ञा फुगायची. मी विचारले, त्याची आज्ञा अशी कशामुळे होते? त्याने सांगितले की तो मर्सिडीज चालवत आहे, म्हणून त्याला आज्ञा येते. पण ती काही तुझी मर्सिडीज नाही. तू फक्त चालवत आहेस. एक स्त्री श्री माताजींना भेटली होती. तिची आज्ञा भयंकर होती. श्री माताजींना त्याचे आश्चर्यच वाटले. श्री. माताजींनी विचारले तुम्ही काय करता? ती म्हणाली, की मी बाहुल्या बनविते. ती बाहुल्या बनविते म्हणून तिला आज्ञावर पकड आहे. तुम्हाला परमेश्वराने बुध्दी दिली आहे तर परमेश्वरासाठी काहीतरी करुन तुमचे प्रेम व्यक्त करा आणि देवाला दाखवा, "देवा तू मला ही बुध्दी दिलेली आहेस मला तुझे कार्य करु दे." त्याचे ऐवजी लोकांना वाटते की ते माझे काम आहे. आणि त्याचा फार अभिमान वाटतो. मग आपण फार बुध्दिमान आहोत, उच्च शिक्षित आहोत असे दाखवू लागतात. परमेश्वराला त्याचे काय? आणि ज्ञान म्हणजे तरी काय? सर्वच अविद्या म्हणून हा अहंकार काढण्यासाठी महंमद साहेबांनी एक सोपी पध्दत सांगितली आहे. व ती फारच चांगली आहे. तुमचा जोडा घ्या व अहंकार आला की स्वतःची चांगली जोडेपट्टी करा. परंतु आपल्याला दुसऱ्याचा अहंकार दिसतो. स्वतःचा कधीच दिसत नाही. आपले काय चुकले ते आपल्या लक्षात कधीच येत नाही. दुसऱ्या मध्येच चुकले आहे असेच आपल्याला वाटते. अहंकाराचे हे पहिले चिन्ह आहे की तुम्हाला स्वतःचा ईगो दिसत नाही. तुमचे काय चुकले, तुम्ही कसे वागता, दुसऱ्याला कसे वागविता, तुमच्या बद्दल त्यांना काय वाटते, हे कधीच समजत नाही.

माझ्या वडिलांचे उदाहरण देते. ते इतके निरहंकारी होते. इतके बुध्दिमान व ज्ञानी होते. त्यांच्यासारखे दुसरे कोणी अजून तरी मला भेटले नाही. ते इतके गहन होते. ते टेबलावर जेवत असतील व आम्ही सर्वजण सुध्दा असू. जेवणात मीठ नसले तरी सांगायचे नाही. तसेच जेवायचे. तुम्हाला मीठा शिवाय जेवावे लागे. बोलायचे नाही. नंतर माझी आई म्हणायची, "मीठ नव्हते तर मला का सांगितले नाही? तेव्हा, आमचे मोठे कुटुंब होते.

म्हणजे, माझे चुलत भाऊ (कझिन्स) भाऊ बहिणी वगैरे धरुन आमच्या घरात मोठया खोल्या होत्या. मुलांच्यासाठी व मुलींच्यासाठी वेगळी ब्लँकेटस् होती व त्याच्यातच सर्वांना भागवावे लागे. रात्रभर भांडणे व्हायची. कधी जमिनीवर झोपावे लागे. तेव्हा माझी बहीण म्हणायची की जमिनीवर झोपल्याने अंग दुखते. तेव्हा वडील म्हणाले "दहा दिवस बाहेर जाऊन झोप म्हणजे ठीक होशील. शरीराला आपले गुलाम बनवायला हवे". ते तसेच करायचे. ते सांगायचे. "तुम्ही काही मागायचे नाही. काही मागीतले तर, समजा कोणी जेवण मागीतले तर ते म्हणायचे उपास कर! जेवणात, खाण्यात, कपडयात, प्रॉपर्टीमध्ये, कशाचीही आवड दाखविली तर ते रागवायचे. ऐषआरामाच्या गोष्टीत तर अजिबात इंटरेस्ट असू नये. त्या मिळाल्या की तुम्हाला अभिमान आलाच. शिवाय, ऐषआराम म्हणजे जड गोष्टींची गुलामगिरी. जड गोष्टी तुम्हाला सतत गुलाम बनवीत असतात. ज्या ठिकाणी तुम्ही आरामाची अपेक्षा कराल तेथे तुम्ही गुलामगिरीची अपेक्षा करता. मग ते जड तुमच्या डोक्यावर बसते. अहंकार आल्यावर तुम्ही जास्त गुलाम होता. गुलाम झालेल्याला सर्वात जास्त अहंकार असतो. मग तुम्ही सांगू लागता, माझ्याकडे हे आहे, ते आहे. तुम्हाला सांभाळता येत नाही.

सहज योग्यांच्या बाबतीत हे महत्वाचे आहे की त्याला अगदी कमी सुविध्यांच्यामध्ये रहाता यावे. कोणत्याही परिस्थितीमधे त्याला रहाता यावे. ते योग्याचे चिन्ह आहे. योग्याला जर आरामशीर पलंग आवश्यक असेल, व्यवस्थित जेवण लागत असेल, तो सतत खाण्याकडेच पहात असेल, पैशाकडे पहात असेल, तर तो योगी नाही. त्याला या सर्वांची काहीच गरज नसावी.

मला हे सांगायचे आहे की सहज योगी म्हणून तुम्ही असे विकसित व्हायला हवे, की तुम्ही सहज योगांत परिपक्व व्हाल. तुम्हाला सहज योगात परिपक्व व्हायला हवे म्हणजे, सर्व मोहांच्यापासून, सर्व सवयींपासून, मुक्त रहाल. त्याला योगी म्हणतात. ज्यांची काव्ये तुम्ही वाचली, त्यांना मी सांगितले नव्हते. त्यांना ते स्वतःलाच समजले. त्यांना कसे समजले? कारण ते शुध्द झाले. स्वतःच शुध्द झाले. परमेश्वराशी एक झाले. म्हणून त्यांना सर्व समजले. म्हणून, ही शुध्दता, वगैरे सर्व ज्ञात झाले. उदा. मार्कंडेय पूर्णतया समर्पित होते. आपल्या वडिलांच्याबरोबर ते अगदी साधेपणाने रहात असत. परंतु अतिशय श्रीमंत होते. कारण त्यांना आईची कृपा लाभली होती. त्याच्यामुळे त्यांना हे सर्व चांगले समजले. त्यांना बालपणीच मृत्यू येईल असा शाप होता. त्यांच्या वडिलांनी त्यांना सांगितले की तुला मरावे लागेल, कारण श्री शिवांचा तसा वर होता की मला मुलगा होईल पण त्याला लवकर मृत्यू येईल. ते म्हणाले, ठीक आहे, मी मार्ग काढतो, म्हणून त्यांनी देवीची पूजा केली. देवींनी त्यांना वर दिला. देवीचे त्यांना प्रत्यक्ष स्वरुपात दर्शन झाले. अशा तऱ्हेने हे सप्तशृंगीचे स्थान झाले. सप्तशृंगी म्हणजे सात चक्रे. हे आदिशक्तिचे स्थान आहे. हे आदिशक्तिचे स्थान आहे. म्हणून तुम्ही जेव्हा हे सर्व वाचता, त्यावेळी तुम्ही दिपून जाता की चौदा हजार वर्षापूर्वी हे सर्व त्यांना कसे कळले? सहज योगाशी जुळणारे, ज्याच्यामुळे तुम्ही कोण आहात ते तुम्हाला समजले, किती लोकांना ज्ञात आहे? शिवाय, त्यांनी तरी इतके व्यवस्थित, तंतोतंत जुळणारे कसे लिहले? कारण ते स्वतः आरशासारखे होते. संपूर्ण आरशासारखे, ज्यांच्यामधून जगाला देवी म्हणजे काय ते दिसले. त्यांना फार मोठे श्रेय आहे. शिवाय ते निरंहकारी होते. अहंकारी असेल तर तुम्ही आरशासारखे होत नाही. प्रतिअहंकार असेल तरी तुमच्यात प्रतिबिंब पडत नाही. अहंकार इतकी भ्रामक गोष्ट आहे, की तुम्ही म्हणता "हे मला आवडत नाही, हे मला नको आहे, हे माझे नाही. असेच चालू आहे, तोपर्यंत तुम्ही अहंकाराच्या रुपात आहात, हे लक्षात घ्या. तुम्ही योगी नसून अहंकारी व्यक्ति आहात. म्हणून, अशा पध्दतीने तुम्ही स्वतःला विकसित करा, की अहंकार-प्रतिअहंकाराचे ढग नाहीसे होतील. देवीपूजेची तुम्हाला मदत होते कारण तुम्ही देवी पूजा करता तेव्हा, ती शक्ती आहे, कुंडलिनी आहे. ती तुमची चक्रे विशाल करते, तुमची सुषुम्ना सुधारते, तुमच्या नाडया विस्तृत होतात व सर्व अधिक उघडते. पण ते टिकून रहात नाही.

शिवाय, घागरिला छिद्र असावे तसे आहे. तुम्ही पाणी घाला, ते बाहेर पडते. तसे आहे. सुरवातीला घागर भरली असे वाटते कारण पाणी जोरात पडते. पण काही वेळाने घागर रिकामी होते. तुमचे अगदी तसे आहे.

आपल्यामध्ये छिद्र आहे. ते अहंकार असो प्रतिअहंकार. या दोनच गोष्टी आहेत. या दोनच अडचणी आहेत. ते काढायचा प्रयत्न करा म्हणजे

झाले ते घडवून आणा. सर्वात उत्तम म्हणजे स्वतःला पहा. स्वतःला रागवा. काही चांगले काम कराल, औदार्य दाखवाल, तर मर्यादिपर्यंतच स्वतःचे कौतुक करा. हेच तुमच्यात कमी आहे.

कधी सहज योग्यांना वाटते की आपण परमेश्वरी राज्यात आलो आहोत. पण ते तुमचे साध्य नाही. सचिवालयात काम करणाऱ्या निम्नश्रेणीय माणसाला वाटले की आपण पंतप्रधान झालो, तर तुम्ही काय म्हणाल? त्याची पोझिशन काय? हे तसे आहे. तुम्ही परमेश्वरांच्या राज्यात प्रवेश केला आहे, पण तुमचे साध्य गाठले आहे का? त्याच्यासाठी शिक्षण नको, अभ्यासात विशेष प्रगति दाखवायला नको, नाव, प्रसिध्दी, परिवार, जात, वंश वगैरे काही नको.

नम्रतापूर्वक भक्तीने, ध्यानाने व उन्नत होण्याच्या शुध्द इच्छेने, इतके सुंदर घटित होते की तुम्ही दिपून जाल.

आता आपल्याला काय मिळवायचे आहे, ते पहा - सर्वात प्रथम आपल्याला काय करुन घ्यायचे आहे, दुसरे, ते कसे मिळवायचे व आपण काय मिळविले आहे. आपल्यात भक्ति असायला हवी, अगदी सहज आहे. भक्ति हवी.

आता लोक ध्यान करतात, फोटो पहातात, काय करायला हवे - माझ्या फोटोच्याकडे पहा. असे पहा की जणू तुम्ही तुमच्या आईचा फोटो पहात आहात. व तसे म्हणा. व आईचा फोटो तुमच्या ह्रदयात ठेवा. फोटो ह्रदयात आहे इकडे लक्ष द्या." आई माझे तुझ्यावर प्रेम आहे. कृपया माझ्या ह्रदयात ये. अशा तऱ्हेने आईला ह्रदयस्थ करा. ह्रदयात सर्व बुध्दिमत्ता आहे, सर्व क्षमता आहे. सर्व काही ह्रदयातूनच निर्माण झाले आहे. पण तुमचे ह्रदय बंद असेल तर मेंदू अनियंत्रित होतो. बर्हिगामी होतो. ह्रदयात आत्मा आहे. सर्वांचे तेच नियंत्रण करते. स्वयंचलित सिंपथेटिक, पॅरॅसिंपथेटिक, तुमची सर्व उत्क्रांति, ज्ञान, सर्वच, ज्याच्यामुळे तुम्ही सामूहिक व्यक्ती आहात असे तुम्हाला वाटते. शिवाय आत्मा हाच शुध्द ज्ञान देणारा प्रकाश आहे. म्हणून आत्म्याच्यावर काम करायला हवे. त्यांच्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे, तुमचे ह्रदय विकसित करा. आपले ह्रदय किती विशाल आहे, ते स्वतःच पहा. ठीक आहे. आता पहा, किती लोकांना तुम्ही क्षमा करु शकता, त्यांच्याशी कसे बोलता, दुसऱ्या लोकांच्या बद्दल तुम्हाला काय वाटते? त्यांच्या बद्दल तुम्हाला काही काळजी वाटते का? माझेच घ्या. गरीब माणसाला पाहिले की आत घुसळून निघाल्यासारखे वाटते. त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे असे वाटते. अगदी सहन होत नाही. जसे, इथे काम करणाऱ्या लोकांना बाहेर जायला सांगितले कारण काही लोकांनी हरकत घेतली. म्हणून आपण त्यांना त्या जागेवरुन हलविले. मी सांगितले, म्हणून ते त्या ठिकाणाहून निघाले, पण दुसऱ्या जागेवर त्यांनी झोपडया बांधल्या नव्हत्या. बिचाऱ्यांना रात्रभर, उघडयावरच बसावे लागले. दिवसभर मला जेवण जाईना. इतके वाईट वाटले. मी त्यांना सर्व काही दिले. येथे बसायला सांगितले. सर्व काळजी घ्यायला सांगितली. तरी त्यांच्यापैकी काही आजारी पडले. त्यांच्यावर उपचार केले. कारण, करुणेमुळे माझ्या ह्रदयात जणू वादळ निर्माण होते. व आपण हेच पहायला हवे. गरीबीच्या संबंधी तुम्हाला काही वाटते का? ज्यांना त्रास होतो, ज्यांना मार खावा लागतो, फसविले जातात, त्यांच्याबद्दल तुम्हाला काय वाटते?

सहज योग व्यक्तीसाठी नाही. तुमच्यासाठी नाही. सहज योग्यांच्या सामूहिकतेसाठी नाही. सर्व जगासाठी आहे. तुम्हाला परमेश्वरी प्रेम व करुणा यांचा प्रकाश सगळीकडे न्यायचा आहे. म्हणून पुढील पायरीवर जायचे आहे. आज्ञाच्यावर जायचे आहे. माणसाला जेव्हा वाटेल की मी आता सुखात आहे आणि मला आता हे पाहिजे, त्या वेळी, ज्याला काहीच मिळाले नाही अशा माणसाकडे पहावे. जेव्हा आपण फार मोठे आहोत असे वाटेल, तेव्हा तुमच्यापेक्षा मोठया माणसाकडे पहा - तुमचे चित्त अशा प्रकारे विस्तृत कराल. त्यावेळी तुम्हाला समजू लागेल की मला किती आशिर्वाद मिळाले आहेत. परमेश्वराने मला किती आशिर्वाद दिले आहेत!

प्रथम आत्मसाक्षात्कार, आत्मसाक्षात्काराबद्दल, कृतज्ञता-कृतज्ञता व्यक्त करणे हा सर्वात उत्तम मार्ग आहे. त्याच बरोबर असा विचार करा की मी मला जे मिळाले आहे, त्याच्याबद्दल आभार मानतो, पण ते दुसऱ्याला का देत नाही? पण आपण अतिशय क्रूर, कधी उध्दार, कधी दुसऱ्याचा व्देष करणारे असतो. पण आता ते थांबेल.

आपल्याला दोन शत्रू आहेत. पहिले म्हणजे, तुम्ही स्वतःचेच शत्रू आहात व दुसरा अज्ञान. या दोन शत्रुच्यांवर तुम्ही मात करायला हवी. तुम्ही त्यांना काढून टाकले तर तुमचा कोणीच नाश करु शकत नाही. समजा एक त्रासदायक व्यक्ती आहे आणि तो तुम्हाला त्रास देत आहे. असू दे, त्रासदायक. तो नरकात जाईल. तो त्रास देत असेल तर देऊ दे. त्याच्या भावना वाईट आहेत? तुम्ही कशाला काळजी करता? तुम्ही काही करत नाही. तुम्हाला त्याचे बरे वाटायला हवे. ह्याच्या उलट कुणी त्रास देत असेल, लोक म्हणतात, "हा माणूस मला त्रास देत आहे ह्याच्याकडे इतका पैसा आहे, सर्व काही आहे. इकडे मला त्रास होतोय आणि माझ्याकडे काहीच नाही." "तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे त्याला नाही"

आपण आत्मसाक्षात्कारी आहोत आणि आपल्याला प्रस्थापित व्हायचे आहे हाच सर्वात मोठा समाधान आणि आनंद यांचा स्त्रोत आहे. आपण अलंकृत होणार आहोत. आपण सिंहासनस्थ होणार आहोत, आपण राजे होणार आहोत. मी याची इच्छा केली होती, म्हणून मिरवणाऱ्यांना राजा केले तरी सुध्दा तो, हे, ते, असेच करीत बसेल म्हणून महान व्यक्तीमत्त्व यायला हवं. एक प्रकारचा भारदस्तपणा, शांतपणा, एक विशेष व्यक्तीमत्त्व, ज्याच्यामुळे तुम्ही सहजयोगी आहात, ते यायला हवं. म्हणून मी सांगितल्याप्रमाणे दोन शत्रूंच्या बरोबर तुम्हाला लढायला हवे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे, हे तुम्ही ध्यानात ठेवायला हवे. आणि त्याच्यासाठी पूजा आहेत. पूजेच्या वेळी तुम्ही मला शरणागत झाले पाहिजे. कारण तुम्ही शरणागत नसाल तर तुमचे मन सैर वैर फिरत राहील. एखादया पंख्यामधे तुम्ही काही घालाल तर, तो राहू देत नाही. फेकून देतो. तुम्ही एक प्रकारे तसे आहात.

दुसरा मुद्दा असा की पूजा म्हणजे शरणागति, भक्ती, हृदयामधे त्याची जाणीव. हृदय उघडा. त्यावेळी तुम्ही हृदय उघडायला हवं आणि मी पूजा करीत आहे ही भावना हृदयात हवी. आता समस्या ही आहे की अहंकारी लोकांना काही सांगितले तर ते दुखावले जातात. सगळ्यात वाईट भाग म्हणजे हे त्यांच्या हिताचे आहे हे त्यांना समजत नाही. त्यांनी हृदय उघडायला हवे व जास्तीत जास्त स्वीकारायला हवे. हृदय लहान असेल तर त्यात तुम्ही किती प्रेम घालणार? जसे या वेळी प्रेम वहात आहे, प्रेम वहात आहे, अशा वेळी तुम्ही तुमचे डोके भलतीकडे गुंतविले आहे म्हणून समर्पणामधे चित्त पूर्णपणे लागायला हवे. पूजेमध्ये लोक झोपले असताना मी पाहिले आहे. अनेक लोक झोपतात. याचा अर्थ ते डाव्या बाजूकडे झुकले आहेत. त्यांच्यात भूत किंवा तसे काही तरी असावे. मी त्यांच्याशी बोलत असते व ते झोपतात. या गोष्टी समजायला हव्यात. तुम्ही तसे का करता? ते काढून टाकण्याचा प्रयत्न करा. स्वतःला सुधारा, जागरुक रहा आणि ओढून घ्या. जेवढे जास्त घेता येईल तेवढे घ्या. त्याच्यासाठीच पूजा असते. तुम्ही नऊ पूजा केल्यात आणि त्या नऊ पूज्यांच्यामध्ये आपण अधिक सुधारलो का? अधिक मिळविला कां? आपण स्वतःमध्ये अधिक प्रेम, अधिक आनंद, अधिक समजूतदारपणा, अधिक समाधान भरले आहे का?

आजचा शेवटचा दिवस आहे आणि म्हणून त्याचा विचार करायला हवा. नंतर उद्या आनंदाचा दिवस आहे. कारण आपण काय केल आहे? म्हणून आज जाऊन स्वतःचे पूर्ण चित्र उभे करा. या नऊ दिवसात मी काय मिळविले? आता माझ्याकडे काय आहे? माझ्यात हे आहे? माझ्याकडे ते आहे? या सर्व गोष्टी तुमच्या अंतरमायी तुम्ही पाहा आणि तुमच्यामध्ये त्या आहेत म्हणून आनंद व्यक्त करा हा विजय आहे. उद्या विजयाचा दिवस आहे. कारण तुम्ही स्वतः वर आणि तुमच्या अज्ञानावर विजय मिळविला आहे. तुम्ही स्वतःला जिंकले आहे. तुमच्या अज्ञानाच्या अंधकाराला जिंकले आहे. हाच उद्याचा संदेश आहे.

**ईश्वराचे तुम्हाला आशिर्वाद.**

# "जयश्री माताजी"
# सहस्त्रार दिन ५ मे १९८७

सहस्त्रार दिवस ५ मे, १९८७ ऑस्ट्रेलिया आजचा दिवस सर्व सहज योग्यांसाठी फार महान आहे. फार पूर्वीपासून माझी इच्छा होती की आता उघडले पाहिजे पण योग्य वेळ येई पर्यंत मी वाट पहात होते. कारण योग्य वेळी ते करणे महत्वाचे होते.

औरंगाबाद मध्ये एका लहान मुलाने मला प्रश्न विचारला, श्री माताजी ब्रह्मचैतन्याची सर्व व्यापक शक्ती सर्व ज्ञानेंद्रियांच्या [senses] पलिकडची आहे तर ती कशी काय जाणवते? हा प्रश्न त्याने मला विचारला, तोच आत मी तुम्हाला विचारतो

या पूर्वी, ज्यांना साक्षात्कार झाला होता ते, जसे तुम्ही आता त्याबद्दल बोलू शकता की आम्ही ते आमच्या जाणीवेत अनुभवतो, तसे सांगू शकत नव्हते ते त्याचे स्पष्टीकरण देवू शकत नव्हते, अनुभवात घालू शकत नव्हते. त्यांनी ते, जसे एखाद्याने आंब्याची चव शब्दात सांगावी तसे शब्दांनी सांगण्याचा प्रयत्न केला. आंब्याची चव तो खाल्याशिवाय समजत नाही. मग तुम्ही कितीही सांगा की, फार उत्तम आहे, महान आहे इत्यादी. तेव्हां आता काय झाले आहे, हा प्रश्न आहे. याशिवाय पूर्वीचे संत होते, ते शेवटी कंटाळले. ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी समाधी घेतली. एका खोलीत जाऊन ते तिथे बसले व समाधी घेतली. एका खोलीत जाऊन ते तिथे बसले व समाधी घेतली व देह सोडला. त्यांनी उपमा दृष्टांत देऊन ते सांगण्याचा प्रयत्न केला. खिस्तांनी स्वतःला क्रूसावर चढवून घेतले हे कशामुळे झाले इतके ते निराश का झाले ? तर, हे गूढ काय आहे, ते कोणी तुमच्यापैकी सांगू शकतेय का ?

उत्तर सोपे आहे पण पचनी पडायला अवघड आहे. ते म्हणजे यापूर्वी जे अवतार पृथ्वीवर झाले ते सहस्त्राराचा भाग आहे.त ते ब्रह्मचैतन्याचा भाग होते. ते आदिशक्तिचा भाग होते. ते पृथ्वीवर आले व अशा लोकांना आत्म साक्षात्कार दिला की जे फार ऊच्च दर्जाचे लोक होते, की ज्यांना काहीच समस्या नव्हत्या जणू काही ते अवतार प्रेमाच्या महासागरातून आले व लोकांना त्या प्रेमाच्या महासागरात व त्याचा आनंद होण्यासाठी घेऊन गेले. जसे कबीराने सांगितले की, " जब मस्त हुए तो क्या बोले " म्हणून बऱ्याच लोकांनी मौन धारण केले. ते त्या प्रेमाच्या महासागरात पूर्णपणे विरघळून गेले. पण तुम्हाला तसे झाले नाही. तुमच्यात काहीतरी विशेष घडले आहे.

तर, संपूर्ण ब्रम्हचैतन्य प्रेमाचा, संपूर्ण महासागराने एका ढगाचे रुप घेतले आहे व ते म्हणजे आदिशक्ति. तुमच्यावर चैतन्याचा वर्षाव करण्यासाठी तुम्हाला जोपासण्यासाठी तुम्हाला मोठे करण्यासाठी पृथ्वीवर अवतरले आहे व तेही आपल्या प्रेमाचा आविष्कार करुन तुम्हाला आदिशक्तीच्या शरीरात धारण करण्यासाठी. गंगेच्या पाण्यात एखादा घडा असावा तसे तुम्ही आदिशक्तिच्या शरीरात एखाद्या पेशी प्रमाणे आहात व तुमचे व्यक्तित्व, व्यक्तिमत्व यांचा सांभाळ केला जात आहे. तरीसुद्धा तुम्हाला तुमच्या ज्ञानेंद्रियांच्या ( senses) माध्यमामधून ब्रह्मचैतन्याची जाणीव होऊ लागली आहे व शिवाय दुसऱ्यालाही तुम्ही आत्म साक्षात्कार देऊ शकता. पण तुम्ही आदिशक्तिच्या शरीरात आहात. जोपर्यंत तुम्ही आदिशक्तिच्या शरीरात आहात तोपर्यंत तुम्ही हे सर्वकाही करु शकता.

तर अशी महान घटना घडली आहे की, सर्व सहस्त्रार त्या अंतर्गत असलेल्या देवतांच्या सात पीठासकट उघडले आहे. सर्व हे संपूर्ण तुमच्या आईच्या रुपात आले आहे, जी अतिशय नम्र आहे, खेळकर आहे व महामाया आहे. ही घटना सर्व मानवजातीच्या दृष्टीने व संपूर्ण विश्वाच्या दृष्टीने अतिशय महान आहे की तुम्ही आत्म साक्षात्कार घेऊ शकता, दुसऱ्याला देऊ शकता, ब्रह्मचैतन्याची अनुभूती घेऊ शकता. तर्काने समजू शकता व दुसऱ्याला समजावू शकता.

हेच उदाहरण घ्या ही जी फुले दिसत आहेत ती ज्या लोकांनी आणली त्यांच्या उष्णतेमुळे मरुन गेली होती. मी फक्त त्यांच्यावर चैतन्य लहरी मिश्रीत पाणी शिंपडले. आता बघा ती कशी टवटवीत दिसत आहेत. ब्रह्मचैतन्याने त्यांना पुन्हा ताजेतवाने केले आहे. तुमचे तसेच आहे. तुम्ही कसे ताजे व सुंदर दिसत आहात. सहजयोगी कोणीही ओळखू शकतो. या सर्व परिस्थितीत, आपण एक गोष्ट जाणली पाहिजे की काही मर्यादा आपल्याला पाळणे आवश्यक आहे. सर्वात प्रथम, की मी तुम्हाला माझ्या शरीरात धारण केले आहे. म्हणजे एखादी बाहेरची वस्तु (foreign things.) शरीरात घेणे, ती सांभाळणे व वाढविणे. पण जर तुम्ही त्रासदायक झाला तर मी ते सहन करु शकत नाही व तुम्हाला बाहेर फेकावे लागते. काही लोक फारच त्रासदायक असतात. ते ध्यान करत नाहीत. ध्यानाच्या त्यांच्या काही विशिष्ट कल्पना असतात. ते सूज्ञ होत नाहीत. भूत किंवा भविष्य काळातच रममाण होऊन राहतात.

उदा. मी तुम्हाला नाकात तूप सोडायला सांगितले होते. ती अगदी साधी गोष्ट आहे. पण महत्वाची आहे. कारण तुमचे हंसाचक्र फारच खराब आहे व एडसच्या रोगाचे एक लक्षण म्हणजे खराब झालेले हंसाचक्र. तुम्हाला एडस्च्या रोगाचा धोका आहे. पण ही साधी गोष्ट सुद्धा पाळली जात नाही. मी काय सांगते, ते ऐकणे हे तुमचे धार्मिक कर्तव्य आहे. तुम्ही माझ्या आज्ञा पाळल्या पाहिजेत. माझे हात, माझी बोटं, माझे पाय, माझ्या आज्ञा ऐकतात मग तुम्हाला मी मोठे योगी बनविले, मान सन्मान दिला, आदिशक्तिच्या शरीरात धारण केले व माझ्या शरीरात तुम्ही पेशी आहात तर मग तुम्ही का नाही पाळत ?

सर्वात प्रथम म्हणजे अशा प्रकारचा प्रयोग करणे, बाहेरच्या वस्तूला शरीरात धारण करणे, म्हणजे फारच धाडसाचे काम आहे व कृती धोकादायक आहे. फारच प्रेमाने, करुण्याने, पेशन्स ठेवून व सर्वात महत्वाचे म्हणजे अतिशय मेहनत करुन हे साध्य करावे लागते. तेव्हा, मी सहस्त्रार उघडले आहे, ही सर्वात महान घटना आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अर्थात मी सहस्त्राराची स्वामिनी आहे व सर्व चक्रांची स्वामिनी आहे पण मी सर्व चक्रांच्याही पलिकडे आहे. फारच पलिकडे आहे. जर अशी परिस्थिती आहे तर तुमच्या सहस्त्राराची काळजी घेणे फारच महत्वाचे आहे. म्हणजे माझी व तुमच्या स्वतःच्या हृदयाची, जे तुमच्या सहस्त्रारात ब्रह्मरंध्र पीठ आहे व जे तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर उघडले जाते.

सहजयोग सगळ्या बाजूने पसरत आहे पण त्याची उंची वाढली पाहिजे व तुम्ही, मी कोण आहे हे जर योग्य प्रकारे समजून घेतले तर सहस्त्रार सहजच स्वच्छ राहील. सहस्त्रार स्वच्छ ठेवण्यासाठी मी जे काही सांगते ते तुम्ही मानले पाहिजे व मी दैवत आहे हे जाणून माझ्या सांगण्याचे पालन केले पाहिजे.

सहस्त्रार स्वच्छ ठेवण्यासाठी तुमचे हृदय उघडले पाहिजे. तुमचे हृदयच जर उघडले नाही तर माझ्या प्रेमाने मी ते कसे भरणार ? तुमचे योगी बंधू भगिनींसाठी तुम्ही हृदय उघडे केले पाहिजे. मागे तुमच्या बाबतीत घडलेल्या घटनेमुळे जर तुम्ही चिंतित असाल तर अशा घटना सहजयोगात घडणार नाहीत. ते अशा तऱ्हेने घडविले आहे. जर एक हात दुखत असेल तर त्याची काळजी घ्यायला दुसरा हात आहे. तुम्ही काही एकटे नाही. तुम्ही सामूहिकतेच्या ( collective being) शरीरात आहात जर कोणी मूर्ख व बावळट लोक असतील तर अशांच्यासाठी सहजयोग नाही, संस्कृतमधे त्यांना 'मूढ' म्हणतात. तसेच जे अतिशहाणे असतील व स्वतःला फसवायचा प्रयत्न करत असतील अशांसाठी सुद्धा सहजयोग नाही. मानवी बुद्धीमध्ये कसेही फिरण्याची क्षमता आहे. तसेच जे लोक असहजपणे वागत असतील त्यांच्यासाठी पण सहजयोग नाही. हळूहळू त्यांच्या चैतन्य लहरी जातील, तुम्ही आजारी पडाल, तुमच्यापुढे समस्या येतील व तुम्ही अडचणीत याल. ही तुम्हाला वॉर्निंग नाही तर विनंती आहे, कारण तुम्ही माझ्या शरीरात आहात. जेव्हा जेव्हा कोणी माझ्या शरीरात राहून मला त्रास देतो, तेव्हा मला तो सहन करावा लागतो. मला फारच हाल सोसावे लागतात. हा फारच विचित्र स्वरुपाचा सुळावर चढविण्याचा प्रकार आहे. ज्यामध्ये प्रत्येक क्षणाला, ज्याला हवे असेल तसे, तो मला त्रास देऊ शकतो. मला छळण्यासाठी सहजयोग्यांच्या हातात सर्व कायदे आहेत. तसेच त्यांची ही क्षमता आहे, शक्ती आहे, की ते निरंतर माझ्या हृदयात राहू शकतात. तुमची हृदये उघडा. आता आपली हृदये कशामुळे बंद राहतात हे पाहिले पाहिजे. पहिले म्हणजे मागे घडलेल्या गोष्टींच्या भितीमुळे आपले हृदय बांधलेले राहते. जर वाईट अनुभव आला असेल, तर असे लोक फारच घाबरलेले असतात.

मी पाहिलंय आणि मला फार आश्चर्य वाटलं की इंग्लंडमध्ये, एक दिवस सुदैवाने किंवा दुर्दैवाने, प्रथमच फार बर्फ वृष्टी होत होती आणि त्या दिवशी आम्ही दुसरीकडे ( shift) हलणार होतो. म्हणून मला बाहेर जायचे होते. मी जाताना पाहिले की एका स्त्रीच्या हातात लहान मूल होते व ती दरवाज्यात उभी राहून दुसऱ्या स्त्रीशी बोलत होती. दुसरी स्त्री घराच्या आत उभी राहून, दरवाजा अगदी थोडासा उघडून व चेन तशीच ठेवून तिच्याशी बोलत होती. मी पुन्हा अर्ध्या तासाने परत आले तरी, ती स्त्री तशीच बर्फात उभी होती व आतली स्त्री तशीच आतूनच बोलत होती. मला आश्चर्य वाटले हा Mid summer night Dream सारखा प्रकार काय चालू आहे ? या आतल्या स्त्रीला लहान मूल घेतलल्या स्त्रीची एवढी भिती वाटायचे काय कारण होते? त्याचे कारण म्हणजे तुमच्या मधला अहंकार! तुम्ही दुसऱ्यावर प्रभुत्व गाजविले, दुसऱ्याला छळले व या सर्वांमुळे तुमच्या मनात भिती निर्माण झाली की, दुसरे ही तुम्हाला तसेच वागवतील. नाहीतर इतके दुसऱ्याला घाबरुन दरवाजे बंद करुन घेण्यासारखे काय आहे ? दुसरे म्हणजे तुम्हाला कोणीतरी छळले असेल व म्हणून तुमचे हृदय बंद झाले आहे. त्यामुळे दुसऱ्यासाठी तुम्ही तुमचे हृदय उघडू शकत नाही. दुसऱ्याला त्रास दिल्यामुळे तुम्ही गप्प बसता ? एखाद्या प्रेतासारखे नुसतेच पहायचे.

समजा मी अशी असते, तर सहजयोगाची व सहस्त्राराची ही गुपितं तुम्हाला कोणी सांगितले असती ? असा स्वभाव ,ज्या लोकांना मागे कोणीतरी घाबरविले असेल, त्यांचा, अथवा ज्यांनी आपल्या खराब विशुद्धी चक्रामुळे इतरांना घाबरविले असेल, अशांचा होतो.

आक्रमकता हा पश्चिमेकडे आणखी एक स्वभावधर्म आहे. तो तुम्ही लोकांनी सुद्धा उचलला आहे. कोणतीही जबाबदारी तुमच्यावर सोपविली की लगेच तुम्ही आक्रमक बनता. माझ्या आत मला हे सहन होत नाही. समजा मी एखादे औषध घेतले व त्याच्यामुळे माझ्यातल्या काही पेशी फार आक्रमक झाल्या तर काय होईल ? शेवटी मी कॅन्सरची रुग्ण होते. आक्रमक पेशींनाच घातक पेशी म्हणतात. अशा पेशी तुमच्याकडे व्यवस्थित लक्ष देत नाहीत, उत्तम आरोग्य देत नाहीत व तुम्ही दुसरे काही नाही, तर घातक पेशी होता, जिच्यामुळे कॅन्सरचा प्रादुर्भाव होतो. कॅन्सरचे रुग्ण होता. अशी व्यक्ति सहजयोग्यांमध्ये कॅन्सर पसरविते. काही स्त्रीया व पुरुष कसे आक्रमक होते, याच्या मी कितीतरी भयंकर गोष्टी ऐकल्या आहेत. एखादे लहान पद तुम्ही एखाद्या व्यक्तीला द्या, लगेच ती आक्रमक होते, समजा एखाद्या व्यक्तिला लीडर केले, लगेच तिच्या नवऱ्याला किंवा बायकोला वाटायला लागते की, मी किंवा तिचा नवरा जणू काही पंतप्रधान किंवा तशी व्यक्ति झाली आहे. हा आक्रमकपणा दुसऱ्याला आक्रमक बनवितो. तुम्ही एक म्हणता मग दुसरा काहीतरी म्हणतो, अशी प्रतिक्रिया सुरु होते. आपल्यात स्वतःचे काहीच नाही का ? की आपण प्रतिक्रियाशील होतो ? कुठल्याच गोष्टीची प्रतिक्रिया होता कामा नाही. आपल्या कडे स्वतःचे काहीतरी असेल तर आपल्यामध्ये दुसऱ्याने आपल्याला काही सांगितले किंवा केले तरी त्याची प्रतिक्रिया होता कामा नये. ते सर्व तिथल्या तिथे संपले पाहिजे.

तुमची हृदये उघडा, म्हणूनच तुम्ही भारतात आल्यावर पाहिले असेल की विशेषतः इंग्रज लोकांबद्दल किंवा पोर्तुगिज लोकांबद्दल त्यांच्या हृदयात कोणताही राग नाही. उलट त्यांना किती प्रेम आदर वाटतो. कारण ते, तुम्ही त्यांच्यासाठी चांगलं काय केलं, हे पाहतात. एकदा काही ब्रिटिश लोकांनी हायकोर्टाला भेट दिली. लगेच त्यांची भेट साजरी करण्यासाठी हायकोर्टाला सुटी देण्यात आली. पण तुम्ही जर इंग्लंडला गेलात तर ते तुम्हाला मारतीलच व हाकलून देतील. तर हा आक्रमक स्वभाव तुमच्या हृदयातून गेला पाहिजे. अगदी गेला पाहिजे. माझ्या शरीरात आक्रमक लोकांसाठी बिलकुल जागा नाही. मी कधीही तुमच्या बरोबर आक्रमकपणाने वागले नाही व तुम्ही ही माझ्याशी आक्रमकपणाने वागू नये. जर तुम्ही एखाद्या सहज योग्यांशी आक्रमकतेने वागलात तर तुम्ही माझ्याशी आक्रमक झालात. पण असे लोक इतरांशी आक्रमक नसतात. जसं वाईट नवरा बायकोशी आक्रमक असतो, इतरांशी नाही. जे सहजयोगी नाहीत त्यांच्याशी ते आक्रमक नसतात.

हा सहस्त्राराचा फार मोठा भाग आहे. कारण अहंकार सहस्त्राराचा फार मोठा भाग व्यापतो. तुमचे सहस्त्रार जर या अहंकारामुळे व्यापले गेले, तर मी तुम्हाला किंवा मला स्वतःला सुद्धा काय मदत करु शकणार ? इतके लोक तुम्ही माझ्या शरीरात फास्ट सर्क्युलेट होत असता व बहुतेक माझ्या हृदयात राहण्यासाठी धडपडत असता, पण ते माझ्या इगोमध्ये जाऊन बसतात. परंतु मी निरहंकारी आहे, कारण माझ्यात (प्रतिक्रिया) नाही. जर प्रतिक्रिया नसेल तर अहंकार वाढणार नाही. मी माझ्या शांती व वैभवात राहून सहजयोग घडवत असते. मी प्रतिक्रिया व्यक्त करीत नाही. पण तुमच्या प्रतिक्रियेचा मला त्रास होतो. कारण तुम्ही माझ्यात आहात.

दुसरा भाग लहानपणापासून असलेल्या भितीमुळे बनतो. अमेरिकन लोकांचे मला माहित नाही, पण पुष्कळ अमेरिकन लोक माझ्याकडे आले होते. ते अगदी वेडे होते. त्यांच्यात काहीच normal नव्हते ते एकतर बोलणारच नाहीत किंवा असंबद्ध बोलतील व काहीच समजणार नाही. फ्रेंच लोकांचे ही तसेच आहे. मला वाटते, जगात दुसऱ्या कोणाला वेड लागण्याच्या आधी फ्रेंच लोक वेडे झाले असावेत. अगदी वेडे लोक, त्यांची एकही गोष्ट सरळ नसते. प्रत्येक गोष्ट उलटी असते. जेव्हा आपण भारतीय टेलिफोनला नावे ठेवतो, तेव्हा ते फ्रेंच लोकांनीच बनविले आहेत हे जाणले पाहिजे. मी नेहमी म्हणते की पुण्यातील टेलिफोन पाहण्यासाठी असतात. कारण त्याला पुण्यपटणम् म्हणतात. म्हणजे पुण्याचे शहर, आणि त्या टेलिफोन मधून फक्त परमेश्वरच ऐकू शकतो. पण परमेश्वर सुद्धा ऐकू शकत नाही. तेव्हा अशा प्रकारचा अर्धवटपणा किंवा वेडेपणा अथा आक्रमक स्वरुपाचा वेडेपणा, हा अहंकार - प्रति अहंकाराच्या पातळीवर गेल्याने येतो. आणि प्रथम त्यांच्यात " ह्यात काय चुकले ? " अशी प्रवृत्ती निर्माण होते, व नंतर जेव्हा बोलतात तेव्हा ते भांडत असतात आणि काही काळानंतर त्यांच्यातील आक्रमकता अगदी दिसून येते. आणि मग असे होते की त्यांची डोकी फिरली आहेत, अमेरिकन लोकांमध्ये हे सगळीकडे आहे. ते बोलत असतात तेव्हा एकही चांगला अमेरिकन सापडणार नाही की ज्याच्या चेहऱ्याचा किंवा शरीराचा एखादा भाग विचित्रपणे हालत नाही. प्रत्येक ठिकाणी त्या what 's wrong ( त्यात काय बिघडले ) या प्रकारामुळे कितीतरी नाड्या ताणलेल्या असतात. आणि मग ते प्रत्येक गोष्ट स्वतःच ठरविण्याच्या अतिम अवस्थेपर्यंत जातात. हयाची पार्श्वभूमी अशी आहे की, एक भूत, आणि हे भूत, भूतकाळातले अथवा भविष्यकाळातले नाही, तर ते वर्तमानकाळातले आहे आणि या भूतला मी भौतिकता म्हणते.

ही "भौतिकता" अतिशय भयंकर आहे. ही अतिशय हास्यास्पद व लाजीरवाणी गोष्ट आहे. जी मानवाला शोभून दिसत नाही. कुत्रासुध्दा हया भौतिकतेचा तिरस्कार करेल. मानव कोणत्या पातळीला येऊन पोहोचला आहे. ही भौतिकता माणसाला अत्यंत निर्लज्ज बनविते. एखाद्या स्त्रीला

"तुमच्याकडे माझा चमचा आहे का?" असे विचारताना लाज सुध्दा वाटत नाही. भारतात, आम्ही लहान असताना सांगायचे, म्हणजे ती आमची संस्कृती आहे, जर एखाद्याची वस्तु आपल्याकडे असेल तर आपण ती सांभाळली पाहिजे ,व परत केली पाहिजे आणि जर आपला हिरा जरी दुसऱ्याकडे असेल तरी तो मागायचा नाही. "हा चांगला शिष्टाचार नाही. हिरा हा महत्वाचा नसून, काय महत्वाचे आहे तर चांगले संबंध, मैत्री व दुसऱ्यांच्या भावनांची कदर तुम्ही असं कसं विचारू शकता? जर त्यांना हिरा सापडला असता तर त्यांनी तो परत केला असता. त्यांनी जर काही विचारलेच नाही. याचा अर्थ हिरा नाही आणि तो जरी असता तरी हिरा म्हणजे काय? तुम्ही घातला काय किंवा त्यांनी घातला काय, काय फरक पडणार आहे?

माझ्या वडिलांच्या घराची दारे सतत उघडी असायची, दिवसरात्र उघडी असायची. ज्या अर्थी घराची दारे उघडी आहेत, त्याअर्थी घरात काहीच मौल्यवान वस्तु नसतील, असा विचार करुन कधीच चोर येत नसे. आमच्याकडे फक्त एकदाच चोरी झाली, आणि चोराने फक्त ग्रामोफोन व काही रेकॉर्डस् पळवून नेल्या. माझे वडील म्हणाले की त्याला संगीत आवडतं असावं म्हणून त्याने वस्तु नेली. तेव्हा आता पोलिसांना कळविण्यात काय अर्थ आहे?

म्हणून ही भौतिकता एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्यासारखी आहे आणि हा रोग सगळ्यात वाईट रोगापेक्षाही भयंकर आहे. लोक किती त्याच्या आहारी जातात! तुम्हाला असे doctor माहित असतील की जे एखाद्या क्षुल्लक रोगांसाठी तुमचे दात, डोळे , नाक पैसे सर्वकाही काढून घेतात. उदा. मलेरियासरखा रोग किंवा कुठलाही रोग हा रोग तुमच्यातील सर्व सुंदरता, चांगलेपणा नष्ट करतो, काढून घेतो.

उदा. या भौतिकतेमुळे अनेक फॅशन्स सुरु झाल्या आहेत. स्त्रियांवर याचा लौकर परिणाम होतो. लांब बाह्या घालण्याची फॅशन निघाली होती, भारतात सुध्दा सुरू झाली आहे. नंतर त्या लहान केल्या, अर्ध्या केल्या, नंतर त्या अजिबात राहिल्या नाहीत. मी म्हणते की "ह्या शर्यतीत मी धावणार नाही." माझ्या नेहमीच एकाच प्रकारच्या बाहया असतात त्यामुळे मी त्याचा विचार करत नाही. मला हवं तसं माझा शिंपी शिवू शकतो कारण त्याला माहित आहे की "मी एकाच प्रकारे शिवते". फॅशनच्यामागे धावण्याची काय गरज आहे? आता एखादी नवीन शर्यत सुरू झाली त्याच्या बरोबर पळायला लागले, दुसरी शर्यत सुरू झाली, त्याच्या मागे धावायला लागले, तिसरी शर्यत सुरू झाली, त्याच्यामागे पळायला लागले. आणि हया फॅशनच्या निरर्थक शर्यती मागे सदा सर्वकाळ धावत असता. आता डोक्याला तेल न लावण्याची एक नविन फॅशन सुरु झाली आहे. त्यामुळे तुम्हाला टक्कल पडते आणि तुम्ही टोप खरेदी करता. हे सर्व धंदेवाईक लोक घडवून आणतात, हा धंदा आहे. आधी तुम्ही टकले व्हा व मग त्यांच्याकडून टोप विकत घ्या. आता टोप स्वच्छ ठेवण्याकरिता वेगळे पैसे, वेड्यासारखे चालू असते. आता दुसरा एक प्रकार, लंडनमध्ये आता एक नविन फॅशन सुरु झाली आहे. कारण त्यांना पैसा मिळवायचा असतो. लोकांमध्ये एवढेसुद्धा समजण्याची किंवा तर्कबुद्धी राहिली नाही की जे पूर्वी काही ते शिकवत होते आज त्याच्या अगदी विरुद्ध ते वागत आहेत. तुम्ही जुन्या फोटोत पहात असाल Tail coat वापरत असत, तुमचे केस व्यवस्थित ठेवत असत, त्यानंतर three piece suits आले, त्यानंतर घट्ट कपडे आले की ज्यामुळे काहींच्या रक्तवाहिन्यासुद्धा अरुंद होतात. आता तर अगदी सैल कपडे वापरण्याची फॅशन सुरु झाली आहे. एकदा तर मी पाहिले की एक स्त्री एका ब्लँकेट पासून तिचा पोशाख ( dress) तयार करत होती, मला वाटले ती एखादी priest किंवा दुसरी कोणी तरी असावी, इतका हा मूर्खपणा सुरु झाला आहे.

कल्पना करा, सहस्त्राराचा विचार करा. परमेश्वराचा विचार करा. " आपण कोणत्या जगात चाललो आहोत, ते जग अगदी मूर्ख आहे. तेथे लोक मूर्खपणाच्या गोष्टीमागे धावत असतात. ते बदलते जग एक डोकेदुखी आहे. कारण आता कोणती फॅशन आहे, याचा आपल्याला सतत विचार करावा लागतो. पेपरमध्ये शोधावे लागते की आता कोणती फॅशन चालू आहे. हे भूत तुमच्यात शिरल्यामुळे ही सर्व बनवा बनवी चालू आहे.

जेव्हा तुम्ही सहजयोगात येता तेव्हा काळजी घ्या की भौतिकता तुमच्यात प्रवेश करणार नाही. ते महत्वाचे नाही. जेव्हा एखादी व्यक्ति मरण पावते तेव्हा मला नक्की माहित नाही, तुम्हाला काळे किंवा पांढरे कपडे घालावे लागतात. इंग्लंडमध्ये माझ्या यजमानांचे जवळचे मित्र मरण पावले आणि माझ्याकडे पूर्णपणे काळी साडी नव्हती. आपल्याकडे अशी साडी नसते. मला समजत नव्हते काय करावे ? मी माझ्या यजमानांना सांगितले की " माझ्याकडे काळी साडी नाही" आणि ते म्हणाले " मग तू येऊ नकोस ." विचार करा मी जर त्यांच्या पत्नीकडे गेले नाही तर तिला काय वाटेल ? त्याचे काही नाही आणि महत्वाचे काय तर काळी साडी.

ही भौतिकता जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तुम्हाला फसवते. तुम्ही यात कसे अडकलात हेच मला प्रथम समजत नाही. आणि दुसरीकडून तेच लोक तुम्हाला फसवितात. " बरं, हे काही बरोबर नाही. आता हे फार झालं. तेव्हा असंस्कृती काढा" असंस्कृती हा आणखी एक भौतिकतेचा प्रकार आहे. आणखी एक वेडेपणा आहे. लंडनमध्ये सध्या असंस्कृती चळवळ चालू आहे. ज्यांना पंक्स म्हणतात, म्हणजे असंस्कृतीची चळवळ म्हणतात. कदाचित आता हे कालबाह्य झाले असेल, मला वाटते, पण सध्या तरी पंक्स दिसतात.

तसे केस करायला त्यांना ४० पाऊंड पर्यंत भरावे लागतात. असे केल्याने तुम्ही पैसे वाचवता ? तेव्हा या सर्व गोष्टी तुमचे चित्त सत्यापासून उच्च मूल्यांपासून, मूर्खपणाकडे वळविण्यासाठी केल्या जातात. सहजयोगामध्ये सुद्धा लोकांनी सामूहिकतेतच रहायला शिकले पाहिजे. आपण सामूहिकतेत असणं फार महत्वाचे आहे. हे माझं आहे, हे माझं आहे, हे माझ्या मालकीचे आहे, असे आपण कधीच म्हणू नये. अगदी मुलांच्या बाबतीतसुद्धा तुम्ही असे करु नये. हा माझा मुलगा आहे, हा माझा भाऊ आहे, ही माझी बहीण आहे, हे माझं, माझं, निघून गेले पाहिजे. परंतु हे शक्य नाही. हे विसरणे सोपे नाही. कारण यासाठी आपली डावी व उजवी नाभी व्यवस्थित असणे आवश्यक आहे. यासाठी , " आई हे सर्व काही तुझेच आहे." असे हामार्ग आहे. हे असे म्हणण्यात काही धोका नाही कारण जे तुमचे आहे ते मी कधीच घेणार नाही. हे फक्त सुरु करण्यासाठी असे म्हणा की " आई हे सर्व काही तुझेच आहे. हे सर्व काही तुझेच आहे. मी तुझाच आहे, माझे हृदय तुझेच आहे, माझे सर्वकाही तुझेच आहे माझे जीवनही तुझेच आहे." या सहस्त्राराची देवता अगदी साधी आहे. खरोखरच साधी आहे. आणि ती छोट्याशा कार्यामुळे लगेच प्रसन्न होते. थोडसं इकडे तिकडे करण्याने तिला प्रसन्न करता येते. तिला प्रसन्न करण्यासाठी काहीच विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत. ती अत्यंत साधी आहे. व लहान लहान गोष्टीसुद्धा तिला आनंदित करतात. काल तुम्ही माझ्यासाठी फुले आणलीत व मी ती घेतली नाहीत. " इतक्या वेळ आपण फुले घेऊन बसलो आहोत पण श्री माताजींना का देऊ शकत नाही ?" असा विचार तुम्ही नक्कीच केला असेल. मला हा चमत्कार तुम्हाला दाखवायचा होता, म्हणूनच मी ती घेतली नाहीत. आणि अगदी शेवटी ती घेतली. आणि आता पहा सर्व फुलांमध्ये ती किती सुंदर दिसताहेत. फक्त तुम्हाला हे दाखविण्यासाठी म्हणाले " मी आता दमले आहे." मी खाली बसले व तुमच्याकडे पाहिले तेव्हा तुम्ही सर्वजण हातात फुले घेऊन बसला होता. तेव्हा ती लीला विनोदिनी आहे आणि तुम्हाला एखादी गोष्ट करायला सांगते तेव्हा तुम्ही ती करीत नाही. परंतु जरा आड मार्गाने जाऊन मी तुम्हाला दाखविते की ही गोष्ट चुकीची आहे, हे तुम्ही करु नये. यामध्ये वाईट वाटण्यासारखे काहीच नाही. मला सर्व फुले घेता आली असती. परंतु कुणीतरी नक्कीच विचार केला असेल की श्री माताजींनी फुले का घेतली नाहीत ? तुमच्या मनांत असा विचार आला किंवा नाही हे मला माहित नाही. पण मला स्वतःला माहित होत की हा चमत्कार त्यांना दाखवायला मला ही फुले घ्यायची आहे. आणि ती फुले आता सर्वात जास्त वेळ टिकतील कारण ती आता ब्रह्मचैतन्याने Vibrate झाली आहेत. मी गरम पाण्याचा नळ उघडूनसुद्धा नळाला थंड पाणी आले.

अशा प्रकारे अनेक चमत्कार या ब्रह्मचैतन्याचे तुम्ही बघितले आहेत की जे तुम्ही काढलेल्या फोटोमध्ये दिसतात, तुमच्या जीवनात तुमच्या स्वतःमध्ये जो बदल घडतो त्यामध्ये दिसतात, तुमच्या कुटुंबामध्ये तुमच्या प्रत्येकामध्ये दिसतात. तुम्ही ब्रह्मचैतन्यामध्ये असल्यामुळे हे सर्व काही घडत आहे, तुम्हाला हे सर्व काही मिळत आहे. कारण ब्रह्मचैतन्यानी तुम्हाला आशिर्वाद दिले आहेत. दुसऱ्यांना नाही, कारण ते एका वेगळ्याच जगात आहेत, असाच तुमचा त्यांच्या बद्दलचा दृष्टीकोन असला पाहिजे. काय करायचं? त्यांना कशी मदत करायची? शक्य झाले तर एका मर्यादेपर्यंत आपण त्यांना मदत करायची. दुसऱ्यांसाठी आपण स्वतः खाली ओढले जायचे नाही. एका मर्यादेपर्यंतच आपण त्यांना मदत केली पाहिजे. ही आनंदाची गोष्ट आहे की सहजयोग हा खूपच पसरत आहे. परंतु त्याची उंची वाढविण्यासाठी आपल्याला आपला दर्जा वाढवायला हवा. जर काही व्यक्ति उच्च स्थितीला गेल्या, तर इतरही जाऊ लागतील. त्यांचे बरोबर तेथे हेतुचा प्रामाणिकपणा हवा आणि अतिशय समजूतदारपणा हवा. एकमेकांसाठी हृदय उघडा म्हणजे तुम्ही माझ्यासाठी तुमचे हृदय उघडाल. प्रत्येक पेशी दुसऱ्या पेशीला माहित हवी नाहीतर हे घडणार नाही.

ही अतिशय महान घटना घडली आहे की तुम्ही ह्या पृथ्वीवर असताना हे महान आशिर्वाद तुम्हाला मिळत आहेत. किती तरी संताना ते मिळाले नाहीत. कितीतरी महान व्यक्ती ह्या पृथ्वीवर होऊन गेल्या, त्यांनासुध्दा ते मिळाले नाही. जे अवतार ह्या पृथ्वीवर होऊन गेले, त्यांनासुध्दा तुम्ही जे करत आहात, ते करता आले नाही. तेव्हा, स्वतःच्या आत्म्याच्या पात्रतेचे, क्षमतेचे, समाधान व वैभव प्राप्त करून घ्या. इतर लोक तुमच्या पातळीचे नाहीत. तर, तुमचे व्यक्तिमत्व असे घडू द्या, की जे कशाचीही प्रतिक्रिया करणार नाही. आपल्या जवळ आपल्या स्वतःचे असे काहीतरी आहे, आपण प्रतिक्रया करू नये. आपण प्रतिक्रियावादी नाही. ज्या गोष्टी त्रासदायक आहेत त्या नष्ट होतील. सर्वकाही उत्तम, व्यवस्थित होईल. कारण आपण स्वतःच्या पूर्णत्वात व वैभवात उभे आहोत. आता आपल्याला कशाची गरज आहे? कशाचीही नाही. फक्त स्वतःच्या आत्म्याचा आनंद घ्या.

परमेश्वराचे तुम्हा सर्वांना आशिर्वाद.